CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. ०१ मार्च २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३२३ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अमेरिका, इस्त्रायलचा इराणवर हल्ला



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** इराण विरुद्ध इस्त्रायल, अमेरिका असा संघर्ष सुरु झाला. त्यामुळे भारताची मोठी कोंडी झाली आहे. तिन्ही देशांशी भारताचे असलेले संबंध पाहता परिस्थिती आव्हानात्मक आहे. भारत आणि इस्त्रायलचे संबंध सौहार्दपूर्ण राहिले आहेत. तर इराण आणि भारताची मैत्री बरीच जुनी आहे. सामरिक आणि आर्थिक बाजूंचा विचार केल्यास इराणचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. या युद्धात अमेरिका इस्त्रालयच्या बाजूनं आहे. त्यामुळे परराष्ट्र संबंध, धोरण सांभाळताना भारताची गोची होणार आहे.

अमेरिका आणि इस्त्रायलनं आज (२८ जानेवारी) इराणवर संयुक्त हल्ला चढवला. गेल्या काही आठवड्यांपासूनच अमेरिकेनं यासाठीची तयारी सुरु होती. आता युद्धाला सुरुवात झाली आहे. काही देशांनी इराणला जाहीर पाठिंबा दिला आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत जगात दुफळी माजण्याची चिन्हं आहेत. रशियानं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर टिकेची झोड उठवली आहे. पण अद्याप तरी रशियानं युद्धात उडी घेण्याचे संकेत दिलेले नाहीत. संकटात संधी शोधणारा चीन काय करणार याकडेही जगाचं लक्ष लागलं आहे.

युद्ध सुरु होताच भारतानं इराण आणि इस्त्रायलमधील आपल्या नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या. परिस्थितीवर नजर ठेवा. सावधान आणि सतर्क राहा आणि अनावश्यक प्रवास टाळा, असं आवाहन भारताकडून करण्यात आलं. युद्धात उतरलेले देश भारतासाठी महत्त्वाचे आहेत. त्यामुळे भारतानं सावध पवित्रा घेतला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याच आठवड्यात इस्त्रायलचा दौरा केला आहे. या दौऱ्यात अनेक संरक्षण, आर्थिक करार झाले. इस्त्रायलसोबतचे संबंध भारतासाठी महत्त्वाचे आहेत. दुसरीकडे इराणच्या चाबहार बंदरात भारताची मोठी गुंतवणूक आहे. या बंदराचं आर्थिक आणि सामरिक महत्त्व मोठं आहे.

इराण विरुद्ध इस्त्रायल, अमेरिका युद्धात एका देशाची बाजू घेणं भारतासाठी आव्हानात्मक आहे. गेल्या वर्षी जूनमध्येही इस्त्रायलनं इराणच्या अनेक लष्करी तळांवर हल्ले केले होते. तेव्हा १३ जून २०२५ रोजी भारताच्या परराष्ट्र मंत्रालयानं भूमिका स्पष्ट केली होती. इराण आणि इस्त्रायलमधील घटना खूपच चिंताजनक असल्याचं त्यावेळी परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं होतं.

दोन देशांमध्ये संघर्ष झाल्यावर भारतानं कायम संतुलित भूमिका घेतली आहे. युद्ध दिर्घकाळ चालल्यास भारतावर आर्थिक दबाव वाढेल. युद्धामुळे खनिज तेलाचे दर भडकण्याची चिन्हं आहेत. भारत तब्बल ८० टक्के खनिज तेल आयात करतो. त्यात मध्य पूर्वेतून होणारी आयात मोठी आहे. त्यामुळे भारतासाठी परिस्थिती आव्हानात्मक आणि चिंताजनक आहे.

## थोडक्यात...

### अवैध प्रवासी वाहतुकीवरुद्ध धडक मोहीम राबविणार

### बंजारा आरक्षणासाठी समिती

**मुंबई :** मराठा आरक्षणासाठी 'हैदराबाद गॅझेट'चा आधार घेतल्यानंतर, आता त्याच धर्तीवर बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी राज्य सरकारने सकारात्मक पाऊल उचलले आहे. बंजारा प्रवर्गातील उपवर्गांसह या समाजाचा 'एसटी'मध्ये समावेश करण्याबाबतची कायदेशीर आणि तांत्रिक बाजू तपासण्यासाठी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती एम. एल. तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय अभ्यास समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील बंजारा समाज सध्या विमुक्त जाती (अ) म्हणजेच 'व्हीजेएनटी' प्रवर्गात मोडतो. मात्र, हैदराबाद गॅझेटमध्ये या जमातीचा उल्लेख 'आदिम' असा असल्याने, आपल्याला अनुसूचित जमातीचे लाभ मिळावेत, अशी जुनी मागणी समाजाने लावून धरली होती.

### कापूस खरेदीला मुदतवाढ

**मुंबई :** राज्यातील कापूस खरेदीची मुदत वाढवण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत होती. या अनुषंगाने पणन विभागाने कापूस खरेदी मुदत वाढवण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील याबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला.या मागणीचा सकारात्मक विचार करून केंद्र सरकारने राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देत कापूस खरेदीसाठीची मुदत १५ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी शनिवारी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली.

### बिग बॉस मराठी चर्चेत

**मुंबई :** बिग बॉस मराठी ६ मध्ये सातव्या आठवड्यात ड्रामा, आरोप-प्रत्यारोप आणि भावनिक उद्रेक यांचा जोर वाढला आहे. घरातील स्पर्धकांमधील समीकरणे बदलत असताना आयुषच्या नावावरून पुन्हा एकदा वातावरण तापले आहे. अभिनेता आयुष संजीव आणि तन्वी यांच्यात घरात चांगली मैत्री होती. मात्र इतर सदस्यांनी त्यांच्या नात्याबद्दल वेगवेगळे अंदाज लावण्यास सुरुवात केली. अलीकडील भागात राखी सावंत हिने मुद्दाम आयुषचा विषय काढत तन्वीला चिमटा काढला. यानंतर तन्वीने तीव्र प्रतिक्रिया दिली आणि घरात मोठा गोंधळ झाला. या सर्व प्रकारावर 'भाऊच्या वर रितेश देशमुख यांनी तन्वीला थेट प्रश्न विचारले.

### पत्रकारांसाठी स्वतंत्र ॲम्ब्युलन्स

**मुंबई :** राज्यभरातील विशेषतः मुंबई महानगराच्या कानाकोपऱ्यात दडलेल्या, घडलेल्या वेगवान घडामोडी अर्थात, 'ब्रेकिंग न्यूज' त्या-त्या क्षणाला लोकांपर्यंत पोचविणाऱ्या इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट मीडियातील पत्रकार-कॅमेरामन आणि संबंधित घटकांसाठी आता स्वतंत्र 'ॲम्ब्युलन्स' रस्त्यावर उतरल्या आहेत. मीडिया विश्र्वातील धावपळीत पत्रकारांच्या आरोग्याकरिता ही सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नवी मुंबईतील 'आरबीजी फाउंडेशन' आणि' टीव्ही जर्नालिस्ट असोसिएशन'च्या पुढाराकाने सुरू केलेल्या या सेवेचे उदघाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शनिवारी मुंबईत झाले.

### घुसखोरांविरुद्ध कोम्बिंग ऑपरेशन

**मुंबई :** राज्यातील वाढत्या बांगलादेशी घुसखोरांच्या प्रश्र्नावर आता सरकारने कडक पावले उचलली आहेत. गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत घोषणा केली की, मुंबईसह संपूर्ण राज्यात संशयास्पद बांगलादेशी घुसखोरांना शोधण्यासाठी विशेष 'कोम्बिंग ऑपरेशन' राबवले जाईल. झोपडपट्ट्या, संवेदनशील भाग आणि मोठ्या गृहप्रकल्पांच्या ठिकाणी ही मोहीम राबवण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली एक विशेष 'टास्कफोर्स' तैनात करण्यात येणार आहे. भाजप गटनेते प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्र्यांनी ही माहिती दिली.

### राज्यात उकाडा वाढला

**मुंबई :** थंडी सरत आली आहे. आणि हवामानात बदल जाणवायला लागला आहे. मार्च मधल्या आल्हाददायक वातावरणात उकाडा जाणवायला लागला असून हळू हळू गरमीच्या ऋतूला सुरुवात होते आहे. मुंबईत हवामान काही दिवस उष्ण आणि दमट राहणार असून तापमानाचा पारा ३२ अंशाच्या पार जाणार आहे, बदलत वातावरण, कोरड हवामान शिवाय हवेची खराब गुणवत्ता यामुळे मुंबईकरांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. पुण्यातही हवापालट झाली आहे. हवामान कोरडे आणि उष्ण राहणार असून पारा हा ३३ अंशांपर्यंत पोहोचणार आहे.

## विकास – कल्याणासाठी विज्ञान-तंत्रज्ञानाचा वापर करा : पंतप्रधान मोदी



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शुभेच्छा देत भारताच्या वैज्ञानिक कामगिरीचा उत्सव साजरा केला. एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करून मोदींनी विज्ञान दिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आपण संशोधन, नवोन्मेष आणि वैज्ञानिक कुतूहलाचा उत्सव साजरा करतो, जो आपल्या देशाला पुढे नेत राहतो, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले आहे. पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर लिहिले आहे की, हा दिवस सर सी.व्ही. रमण यांनी लावलेल्या 'रमण इफेक्ट' या क्रांतिकारी शोधाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. या शोधामुळे भारतीय संशोधनाला जागतिक नकाशावर भक्कम स्थान मिळाले. आपल्या तरुणांना सक्षम बनवण्याचा, संशोधन परिसंस्था अधिक बळकट करण्याचा आणि राष्ट्र विकास तसेच जागतिक कल्याणासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिला.

## मुंबई-गोवा महामार्ग 'मे' अखेरपर्यंत पूर्ण होईल : भोसले

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २८ फेब्रुवारी :** दरवर्षी होळी आणि गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या लाखो चाकरमान्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्र्न असलेल्या मुंबई-गोवा महामार्गाचे काम आता अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. माणगाव-इंदापूर बायपासचा काही भाग वगळता, येत्या मे महिन्यापर्यंत मुंबई-गोवा महामार्गाचे संपूर्ण काम पूर्णत्वास गेलेले असेल, अशी महत्त्वाची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी आज विधानपरिषदेत दिली.



भाजपा गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्र्नावर उत्तर देताना त्यांनी हे आश्र्वासन दिले.सभागृहात सदस्य निरंजन डावखरे यांनी महामार्गाच्या रेंगाळलेल्या कामाबाबत प्रश्र्न उपस्थित केला होता. या चर्चेत सहभाग घेताना आमदार प्रवीण दरेकर आक्रमक पाहायला मिळाले. हा महामार्ग रेकॉर्डब्रेक उशिरा होणारा मार्ग ठरला आहे. कंत्राटदारांच्या निष्काळजीपणामुळे चाकरमान्यांना वर्षानुवर्षे त्रास सहन करावा लागत आहे. आता होळीचा सण जवळ आला आहे, अशा वेळी प्रवाशांना हा विहित वेळेत पूर्ण होऊन दिलासा मिळणार का? असा थेट सवाल दरेकरांनी विचारला. तसेच, महाड येथील गांधारपाले लेणी परिसरात पर्यटन विकासासाठी बांधकाम विभागाने पुढाकार घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

यावर सकारात्मक उत्तर देताना मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी कामाचे वेळापत्रक स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, चिपळूणचा महत्त्वाचा पूल मे २०२६ पर्यंत खुला होईल, तर हातखंबा उड्डाणपुलाचे काम याचवर्षी एप्रिलपर्यंत पूर्ण होत आहे. माणगाव-इंदापूर मार्गाची मुदत २०२७ असली तरी, उर्वरित महामार्ग मे २०२६ पर्यंत प्रवासासाठी सज्ज असेल. तसेच, गांधारपाले लेणी येथे पर्यटन विभागाच्या माध्यमातून आवश्यक सुधारणा करण्यात येतील, असेही त्यांनी नमूद केले. सरकारच्या या भूमिमेमुळे कोकणच्या विकासाला आणि पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.

## एआय समिटमधील निदर्शने प्रकरण : युवक काँग्रेसच्या अध्यक्षांना जामीन मंजूर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** दिल्लीतील न्यायालयाने इंडिया एआय इम्पॅक्ट समिटमधील निषेधासंदर्भात भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब यांना जामीन मंजूर केला. २४ फेब्रुवारी रोजी न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती. त्याची मुदत संपल्याने चिब यांना शनिवारी दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले. दंडाधिकारी वंशिका मेहता दिल्ली पोलिसांनी त्यांच्या कोठडीत सात दिवसांची वाढ करण्याची मागणी केलेल्या अर्जावर सुनावणी करत होत्या. तथापि, त्यांनी ही याचिका फेटाळून लावली आणि उदय भानू चिब यांना जामीन मंजूर केला.

## 'आयएनएस अंजदीप' भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल



**चेन्नई/वृत्तसंस्था:** आयएनएस अंजदीप, ही पाणबुडी विरोधी युद्धनौका, 'शॅलो वॉटर क्राफ्ट (एएसडब्ल्यू-एसडब्ल्यूसी) प्रकल्पातील चौथे जहाज चेन्नई बंदरात झालेल्या अधिकृत समारंभात भारतीय नौदलात औपचारिकपणे दाखल झाले आहे. नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

पूर्व नौदल कमांडचे फ्लॅग ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ, व्हाईस ॲडमिरल संजय भल्ला यांनी या कार्यक्रमाचे यजमानपद भूषवले. नौदलाचे वरिष्ठ अधिकारी, पूर्ववर्ती अंजदीप चे माजी कमांडिंग ऑफिसर, गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनियर्स (जीआरएसई), कोलकाता आणि लार्सन अँड टुब्रो शिपबिल्डिंग, कट्टुपलीचे प्रतिनिधी आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

नौदल प्रमुखांनी आपल्या भाषणात भारतीय नौदलात जहाजाच्या समावेशाचे धोरणात्मक महत्त्व अधोरेखित केले, तसेच जहाज बांधणी करणाऱ्यांची वचनबद्धता आणि पाठिंबा तसेच जहाज वेळेवर नौदलाच्या सेवेत दाखल करण्यासाठी जहाजावरील कर्मचाऱ्यांनी समर्पित भावनेने घेतलेल्या परिश्रमांची प्रशंसा केली.

कारवारच्या किनाऱ्याजवळच्या समुद्रातील ऐतिहासिक बेटाच्या नावावरून आयएनएस अंजदीप हे नाव देण्यात आले असून, समुद्र किनाऱ्या जवळच्या उथळ समुद्रातील पाणबुडीविरोधी युद्धासाठी खास डिझाइन केलेल्या युद्धनौकांच्या मालिकेत या युद्धनौकेचा समावेश करण्यात आला आहे. या जहाजाच्या बांधणीसाठी ८०% पेक्षा जास्त स्वदेशी सामग्रीचा वापर करण्यात आला असून, यामधून युद्धनौका डिझाइन आणि संरक्षण इलेक्ट्रॉनिक्समधील भारताची स्वयंपूर्णता दिसून येते. यामध्ये प्रमुख स्वदेशी प्रणालींचे एकत्रीकरण समाविष्ट आहे.

'डॉल्फिन हंटर' म्हणून ओळखले जाणारे, ७७ मीटर लांब, १४०० टन वजनाचे हे जहाज, किनारपट्टी प्रदेशात जलद प्रतिसाद आणि शाश्र्वत ऑपरेशन्ससाठी तयार केले आहे. पृष्ठभागावरील धोके प्रभावीपणे शोधणे, त्यांचा मागोवा घेणे आणि निष्प्रभ करणे, यासाठी हे जहाज आधुनिक एएसडब्ल्यू संच आणि एकात्मिक प्रगत लढाऊ व्यवस्थापन प्रणालीने सुसज्ज आहे.

आपल्या पूर्वसुरी आयएनएस अर्नाळा आणि आंद्रोथ नंतर, आयएनएस अंजदीपचे भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल होणे, भारतीय नौदलाच्या, आपल्या दर्जात सुधारणा करणे, आणि क्षमता वाढवण्याच्या नियोजित मार्गातील एक महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यामुळे भारताच्या सागरी व्यापार मार्गांची आणि किनारी भागातील पायाभूत सुविधांची सुरक्षा सुनिश्र्चित होईल. देशाच्या सागरी हितांचे रक्षण करण्यासाठी हे जहाज तामिळनाडू आणि पुद्दुचेरी नौदल क्षेत्राच्या फ्लॅग ऑफिसर कमांडिंगच्या परिचालन आणि प्रशासकीय नियंत्रणाखाली सोपवण्यात आले आहे.



CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मालमत्ताधारकांनी कर भरणा करुन जप्तीची कार्यवाही टाळावी – आयुक्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ फेब्रुवारी :** महानगरपालिकेच्या वतीने कर वसुली मोहीम सुरू करण्यात आली आहे.या मोहिमेस सहकार्य करून मालमत्ताधारकांनी आपल्याकडील चालू व थकीत कराचा भरणा करावा. कर न भरल्यास मालमत्तेची जप्ती करून लिलाव करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी लवकरात लवकर कराचा भरणा करावा,असे आवाहन मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी केले आहे.

फेब्रुवारी महिना संपत आला आहे. तरीही काही नागरिकांकडे मागील कर थकीत आहे. चालू वर्षाचा करही थकीत असून नागरिक कर भरण्यास टाळाटाळ करीत आहेत.महानगरपालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने वसुलीची धडक मोहीम सुरू केली आहे.मालमत्ता कर व पाणीपट्टी कराची थकबाकी मोठ्या प्रमाणात असल्याने मनपाच्या वतीने यापुढील काळात कर न भरल्यास जप्ती मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कर न भरणाऱ्या नागरिकांच्या मालमत्ता जप्त करण्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात २ जप्ती पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. मालमत्ता जप्त करूनही कर भरणा न केल्यास मालमत्तांचा लिलाव करण्यात येणार आहे.मनपाच्या वतीने स्थापित करण्यात आलेल्या १२ पथकातील १०० कर्मचारी मालमत्ताधारकांना भेटून कर भरण्याचे आवाहन करणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी आपल्याकडील थकबाकी व चालू वर्षातील देय असणारा मालमत्ता कर व पाणीपट्टी कराच्या थकीत रकमेचा एकरकमी भरणा करावा,जप्तीसारखी कटू कार्यवाही टाळावी,असे आवाहनही मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी केले आहे.



# एमआयटी येथील मंदिर प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यात भारतीय संस्कृतीचे दर्शन

## सांस्कृतिक महोत्सवात विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कारातून मने जिंकली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ फेब्रुवारी :** येथील एमआयटी शिक्षण संकुलात मंदिर प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य सांस्कृतिक महोत्सवात एमआयटी शिक्षण संकुलातील विद्यार्थ्यांनी आपल्या अष्टपैलू कलागुणांचे प्रभावी सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. भारतीय संस्कृतीतील ‘शक्ती’ आणि ‘बुद्धी’ या मूल्यांचा जागर घडवणाऱ्या या कार्यक्रमाने संपूर्ण वातावरण भक्तिमय व उत्साहपूर्ण केले.





श्री गणेश, श्री महालक्ष्मी, श्री हनुमान मंदिरांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळ्या निमित्त आयोजित सांस्कृतिक महोत्सवास विश्र्वशांती दिंडी प्रमुख सौ. उषाकाकु विश्र्वनाथ कराड, माईर्स एमआयटी शिक्षण संस्थेचे विश्र्वस्त तुळशीराम दा. कराड, सौ. पुनमताई आबासाहेब नागरगोजे, कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, सौ. हेमांगी हनुमंत कराड, सौ. संजिवनी रमेशअप्पा कराड, संचालक प्रा. तेजस हनुमंत कराड, उप प्राचार्य डॉ. यतिशकुमार जोशी, डॉ. वर्षा सांगळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात परंपरेनुसार ‘गणेश वंदने’ने करण्यात आली. विघ्नहर्त्या मंगलमूर्तीच्या आशीर्वादाने प्रारंभ झालेल्या या सादरीकरणाने सकारात्मक उर्जा निर्माण केली. ‘गणपती बाप्पा मोरया’च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सुरेल समूहगायनाने वातावरण अधिकच भारावून गेले. भक्तिमय गीतांच्या सादरीकरणामुळे उपस्थितांना आत्मिक शांतीचा अनुभव मिळाला.

अर्ध-शास्त्रीय नृत्यातून आदिशक्तीच्या तीन रूपांचे दर्शन झाले. महालक्ष्मीचे ऐश्र्वर्य, सरस्वतीचे ज्ञान आणि दुर्गेची शक्ती या तिन्ही रूपांचे सौंदर्य पदन्यास व अभिनयाच्या माध्यमातून प्रभावीपणे रंगमंचावर साकारण्यात आले. ‘हनुमान चालीसा’वर आधारित नृत्य सादरीकरण हा कार्यक्रमातील आणखी एक आकर्षक भाग ठरला. संकटमोचन पवनपुत्र श्री हनुमानांचे शौर्य, पराक्रम आणि प्रभू श्रीरामांप्रती असलेली अखंड भक्ती यांचे सशक्त चित्रण करण्यात आले. या सादरीकरणाला प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते ‘समुद्रमंथन’ या नाट्य-नृत्य सादरीकरणाचे. देव-दानवांनी अमृतप्राप्तीसाठी केलेला संघर्ष, मंदार पर्वत व वासुकी नागाच्या साहाय्याने झालेले मंथन आणि त्यातून प्रकट झालेली रत्ने यांचा भव्य-दिव्य देखावा रंगमंचावर उभा करण्यात आला.

महोत्सवाचा परमोच्च बिंदू ठरला तो ‘नवदुर्गा’ या विशेष नृत्याविष्काराचा. देवीच्या शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडा, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्रि, महागौरी आणि सिद्धिदात्री या नऊ रूपांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. श्रद्धा, धैर्य, शक्ती आणि करुणा या विविध भावछटांचा सुंदर संगम या नृत्यातून अनुभवायला मिळाला.

या सांस्कृतिक महोत्सवाने भारतीय संस्कृतीची समृद्ध परंपरा आणि आध्यात्मिक वारसा यांचे दर्शन घडवून उपस्थितांना एक अविस्मरणीय अनुभव दिला. एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष बीडीएसच्या विद्यार्थ्यांच्या कलाविष्कारामुळे मंदिर प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याची शोभा अधिकच वाढली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परमेश्र्वर सोनवणे यांनी केले. या महोत्सवास माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, भाविक-भक्त व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिध्देश्वर यात्रा महोत्सवात रविवारी कुस्त्यांची दंगल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ फेब्रुवारी :** श्री सिध्देश्वर रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने ७३ वा यात्रा महोत्सव सुरु आहे.या महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम पार पडत असून या अंतर्गत रविवार दि. १ मार्च रोजी कुस्त्यांची दंगल पार पडणार आहे. यात्रा महोत्सवातील या कुस्त्यांच्या दंगलीसाठी लातूर जिल्ह्यासह पर जिल्ह्यातील व परराज्यातील अनेक पैलवान आपली उपस्थिती लावत सिध्देश्वर केसरीचा मान मिळविण्यासाठी नशिब आजमावत असतात. या कुस्तींच्या दंगलीसाठी मल्लांना प्रोत्साहन देण्यासाठी शहरासह परिसरातील नागरिक व कुस्ती प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांच्यासह विश्वस्त विक्रम गोजमगुंडे व अशोक भोसले यांनी केले आहे.



लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानचा यात्रा महोत्सव पार पडत आहे. हा महोत्सव अंतिम टप्प्यात आला असून रविवार दि. १ मार्च रोजी या महोत्सवांतर्गत कुस्त्यांची दंगल पार पडणार आहे. सिध्देश्वर यात्रेतील कुस्त्यांसाठी लातूर जिल्ह्यासह पर जिल्हा व परराज्यातील अनेक मल्ल आपले नशिब आजमावण्यासाठी कुस्तीच्या फडात उतरत असतात. या कुस्तीमधील विजेत्याला मिळणाजया सिध्देश्वर केसरीच्या मानाच्या पुरस्कारासाठी अनेकजण वर्षभर मेहनत घेत असतात. त्यामुळे या कुस्त्यांची दंगल नागरिकांसह कुस्तीप्रेमींसाठी एक मोठी पर्वणी ठरत असते.या कुस्ती स्पर्धेत अंतिम विजेता ठरणाजया मल्लास सिध्देश्वर रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने चांदीची गदा देण्यात येते. याबरोबरच या कुस्ती स्पर्धेत सहभाग घेणाजयांना विविध पारितोषकांची उधळण केली जाते. या स्पर्धेत अंतिम कुस्तीत पराभूत होणाजया मल्लास लातूर महानगरपालिकेच्या वतीने लातूर केसरीचा मान देवून ५१ तोळे चांदीचे कडे देण्यात येते. त्याचबरोबर विविध मान्यवर व कुस्तीप्रेमींकडून देण्यात येणाजया पारितोषिकांमध्ये स्व. सुधाकरराव कोकाटे यांच्या स्मरणार्थ रायगड ग्रुपच्या वतीने अमर कोकाटे यांच्याकडून रत्नेश्वर केसरीचा मान देवून ५१ तोळ्याचे चांदीचे कडे देण्यात येते. यासोबतच स्व. ज्ञानोबा गोपे यांच्या स्मरणार्थ ओम गोपे व जयप्रकाश गोपे यांच्या वतीने ५१ तोळे चांदीचे कडे तर स्व. किशनराव तुळजाराम हलवाई यांच्या स्मरणार्थ केतन हलवाई यांच्या परिवाराच्या वतीने २१ तोळे चांदीचे कडे वेगवेगळ्या विजेत्यांना देण्यात येते. यासोबतच अनेक मान्यवरांच्या वतीने वेगवेगळी पारितोषिके कुस्ती स्पर्धेत सहभागी होवून विजयी होणाजया मल्लांना देण्यात येतात. या स्पर्धा रविवार दि. १ मार्च रोजी श्री सिध्देश्वर देवस्थानच्या प्रांगणात सकाळी ११.३० वाजल्यापासून सुरु होणार आहेत. या कुस्ती स्पर्धेसाठी लातूर शहरासहजिल्ह्यातील मल्लांन ी सहभागी नोंदवावा तसेच सहभागी स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी कुस्तीप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन देवस्थानचे प्रशासक सचिन जाबुंतकर यांच्यासह विश्वस्त विक्रम गोजमगुंडे व अशोक भोसले यांनी केले आहे.

## शिवजयंती निमित्त रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. २८ फेब्रुवारी :** तालुक्यातील येरोळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व संजीवनी ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात ३५ नागरिक, तरुणांनी रक्तदान करून शिबीर यशस्वी केले.यावेळी संरपच सतिश सिंदाळकर आणि प्राथमिक केंद्र आरोग्य अधिकारी यांनी शिबिराचे आयोजन केल्याबद्दल तरुणांचे कौतुक करुन दवाखान्याच्या वतीने नागरिकांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी आवश्यक त्या वेगवेगळ्या प्रकारचे शिबिर, रुग्ण सेवा कार्यक्रम आयोजित करून रुग्णांना दिलासा द्यावे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आवश्यक ती मदत करु असे सरपंच सतिश सिंदाळकर यांनी मत मांडले.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ बालाजी शिंदे, तालुका अधिकारी डॉ नारायण देशमुख यांनी शिबीरास भेट दिली.याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्या सौ तुळसाबाई लोंढे,सरपंच सतिश सिंदाळकर,पत्रकार शिवानंद भुसारे,वैद्यकीय अधिकारी डॉ शुभम सागडे, डॉ गोविंद जाधव, डॉ मनिषा गटकुळ यांच्यासह आरोग्य कर्मचारी, आशा कार्यकर्ती,रुग्ण, ग्रामस्थ उपस्थित होते.

## श्रीकिशन सोमाणी विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ फेब्रुवारी :** येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास



प्रमुख अतिथी म्हणून दयानंद कला महाविद्यालय, लातूरच्या मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुनीता घोडके - सांगोले यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा. डॉ. सांगोले यांच्या हस्ते कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. स्वागतपर मराठी गौरवगीत संगीत शिक्षक स्वप्नाली पुणेकर, कृष्णकांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विद्यार्थिनींनी सादर केले. प्रमुख अतिथींचा परिचय इयत्ता आठवीचा विद्यार्थी संकेत संतोष शेरीकर याने करून दिला. मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांच्या हस्ते प्रा. सांगोले यांचा सत्कार करण्यात आला. इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनी कु. तन्वी अमितकुमार वस्त्रद, कु. सायली अंकुश कांबळे यांनी प्राचीन शिलालेखाची माहिती दिली.

यावेळी बोलताना डॉ. सुनिता सांगोले यांनी भाषा ही प्रभावी असते. त्यात सातत्याने बदल होत असतात. ते स्वीकारले पाहिजे. पण सगळ्यात महत्वाचे म्हणजे आपण प्रत्येकाने भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे,असे सांगितले. कवी कुसुमाग्रज, वि. दा. सावरकर अशा अनेकांचे मराठी भाषेसाठी खूप मोठे योगदान आहे. बोलीभाषा ज्याप्रमाणे आपण वापरतो,त्याप्रमाणे प्रमाण भाषेचाही वापर तेवढाच करणेही गरजेचे आहे. भाषा समृद्ध व्हायला जसे साहित्य साह्यभूत ठरते तसे चित्र, संगीत ठरते. सगळ्यांनीच मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करायलाच हवा असे डॉ. सांगोले मॅडम यांनी आवर्जून सांगितले. मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी आपल्या मनोगतात मराठी दिनाचे महत्व विशद केले.

या कार्यक्रमात विद्यालयातील कला शिक्षक संदीप बोते आणि पल्लवी खंदाडे यांनी काढलेल्या ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेले कवी कुसुमाग्रज, डॉ. भालचंद्र नेमाडे तसेच कर्नाटक संगीत शास्त्रीय गायिका भारतरत्न एम. एस. सुब्बुलक्ष्मी यांच्या रेखाचित्रांचे अनावरण झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इयत्ता आठवीची विद्यार्थीनी कु. वेदिका विलास चिंचोलकर हिने केले. सूत्रसंचालन कु. हर्षिता पोतदार हिने तर आभार प्रदर्शन साईराज वळंके याने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, राहुल पांचाळ, सुनीता जाधव यांच्यासह मराठी विभागाच्या सर्व शिक्षक - शिक्षिकांनी परिश्रम घेतले. या अभिनव उपक्रमाचे संस्थचे अध्यक्ष डॉ सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, कोषाध्यक्ष जयेश बजाज यांनी कौतुक केले.

## शिक्षक संघटनेच्या शिष्टमंडळाने माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख यांची घेतली भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ फेब्रुवारी :** राष्ट्रवादी काँग्रेस शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष मदन धुमाळ यांच्या सेवा गौरव सोहळ्यासाठी राज्याचे माजी मंत्री. दिलीपरावजी देशमुख यांची संघटनेच्या वतीने सदिच्छा भेट घेऊन आग्रहाने निमंत्रित देण्यात आले.

शिक्षक संघटनेचे मदन धुमाळ यांच्या पस्तीस वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर तीस एप्रिल २०२६ रोजी रोजी सेवानिवृत्त होत आहेत. अनेक शिक्षकांचे आशास्थान मार्गदर्शक असलेले दिलीपरावजी देशमुख यांनी धुमाळ यांच्या गौरव सोहळ्यासाठी साहेबांना निमंत्रित करावे असे संयोजकांनी ठरवले होते त्यानुसार आज शुक्रवारी शिक्षक संघटनेच्या वतीने आशियाना निवासस्थानी भेट घेतली निमंत्रण दीले आहे याबाबत सकारात्मक चर्चा झाली आहे.

यावेळी विविध शिक्षक संघटनेचे पदाधिकारी मोहन हाके, मदन धुमाळ गंगाधर आरंभले, माने हैबतराव,राम व्यंजने, दयानंद कांबळे, पांचाळ गणेश, शिवाजी कांबळे, सय्यद सर आदि शिक्षक आणि मुख्याध्यापक या वेळी उपस्थित होते.



## जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार **शोभा संजीव चिट्टे, रा.एल आय सी कॉलनी, लातूर** यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना **शोभा सुभाष चाकोते, रा.एल आय सी कॉलनी, लातूर** यांनी खरेदीखत दस्त क्रं.२५८६/२०१५ अन्वये खरेदी मालकीची व कब्जेवहिवाटीचा रो हाऊस जो की, मौजे. कन्हेरी, ता.जि.लातूर येथील जमीन सर्वे नंबर १३/२/अ पैकीचे प्लॉट नंबर १-३ असून याचे एकूण क्षेत्रफळ ३०२७.२१ चौ.मी. असून, यावर बांधण्यात आलेले श्रध्दा नगर रो हाऊस मधील रो हाऊस नंबर ३/२ असून याचे एकूण क्षेत्रफळ ५८.६६ चौ.मी. असून बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ ७१.४२ चौ.मी. आहे. याची चतुः सीमा खालील प्रमाणे :-

पुर्वेस :- सर्वे नंबर १३ मधील प्लॉटींग, पश्चिमेस ६ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस :- रो हाऊस नंबर ३/१, उत्तरेस रो हाऊस नंबर ३/३.

येणे प्रमाणे वरील चतुःसीमेच्या आतील मिळकत विद्यमान मालकाकडुन लेखी करार करुन घेऊण, इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर मिळकती बाबत जर कोणाचा उजर, आक्षेप, हितसंबंध, हक्क संबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्ट डिग्री, मृत्युपत्र, तारण, लीज, शेजाऱ्याचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक २८/०२/२०२६

**तर्फे ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे**
**नोटरी भारत सरकार**
**शाहू चौक, लातूर**
**मो नं.९४२१९ ८६४९५**

**जाहीर प्रगटन देणार**
**शोभा संजीव चिट्टे, रा.एल आय सी कॉलनी, लातूर,**
**मो नं.९८९०२५७५७१ /९९२३९३६७७७**

# मनपा ॲक्शन मोडवर!

## कॅरीबॅग जप्ती तसेच कचरा जाळणाऱ्यावर कारवाई, ३० हजार रुपयांचा दंड वसूल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ फेब्रुवारी :** लातूर शहर महानगरपालिका आता क्शन मोडवर आली आहे.मनपाच्या वतीने शहरात प्लास्टिक कॅरीबॅग जप्ती तसेच स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. कचरा टाकणारे आणि जाळणाऱ्यावर कारवाई करण्यात येत असून संबंधितांकडून दंडाची वसुलीही केली जात आहे.







महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे व मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या निर्देशानुसार उपायुक्त वसुधा फड यांच्या मार्गदर्शनात शहरात ही मोहीम राबवली जात आहे.या अंतर्गत शहरातील झोन बी मध्ये औसा रोडवर अतिक्रमण करणारे व सिंगल युज प्लास्टिकचा वापर करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करण्यात आली.या कारवाईत २ किलो कॅरीबॅग जप्त करून १२ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. शहरात इतर ठिकाणी देखील अशीच कारवाई करून एकूण १२ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.

उघड्यावर कचरा टाकणाऱ्या व जाळणाऱ्या नागरिकांवरही दंडात्मक कारवाई केली जात आहे. उघड्यावर कचरा टाकणारे ३७ व कचरा जाळणाऱ्या ५ नागरिकांवर मनपाने कारवाई केली.या अंतर्गत १८ हजार रुपये दंडाची आकारणी करण्यात आली आहे. या कारवाईत मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, प्रमुख स्वच्छता निरीक्षक अक्रम शेख,शिवराज शिंदे, डी.एस.सोनवणे,रवी कांबळे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

शहरातील नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळावा. कचऱ्याचे ओला व सुका असे वर्गीकरण करून तो घंटागाडीतच टाकावा. उघड्यावर कचरा टाकू नये तसेच जाळू नये,असे आवाहन महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे यांनी केले आहे.

# परभणी जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेत नियमबाह्य भरतीचा घोटाळा उघड : सहकारमंत्री बाबासाहेब पाटील

## पाच सदस्यीय चौकशी समितीची नियुक्ती : आमदार राजेश विटेकर यांच्याद्वारे प्रश्न

**परभणी ,/प्रतिनिधी-** परभणी जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेत अनेक कर्मचाऱ्यांची नियमबाह्य भरती झाल्याची धक्कादायक बाब विधानसभेत उघड झाली. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी शुक्रवारी (दि. २७) प्रश्नोत्तराच्या तासात या प्रकरणाची कबुली देत चौकशी सुरू असल्याचे स्पष्ट केले.

या संदर्भात आमदार राजेश विटेकर यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर आमदार विजय वडेट्टीवार तसेच आमदार प्रशांत बंब यांनीही या विषयावर सभागृहात चर्चा उपस्थित केली. उत्तर देताना मंत्री पाटील यांनी सांगितले की, बँकेतील काही कर्मचारी व अधिकाऱ्यांनी निवृत्तीपूर्व काही वर्षे आधी वैद्यकीयदृष्ट्या 'अनफिट' असल्याची बनावट प्रमाणपत्रे सादर करून स्वेच्छानिवृत्ती घेतली. त्यानंतर त्यांच्या जागी वारसांना किंवा इतर व्यक्तींना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्यात आल्याचा प्रकार घडला आहे. या प्रकरणामुळे सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी निवृत्त झाल्यानंतरही त्यांना दिलेली मुदतवाढ रद्द करण्याबाबत सहकार विभागाने संबंधित बँकेला पत्र पाठविले असल्याची माहितीही मंत्र्यांनी दिली. नागपूर अधिवेशनात या प्रकरणाची चौकशी जाहीर करण्यात आली होती; मात्र चौकशीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सहकार विभागाचे उपनिबंधक यांनी अपेक्षित सहकार्य केले नसल्याचेही त्यांनी सभागृहाला सांगितले.




दरम्यान, पुणे येथील निबंधक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. ही समिती एका महिन्यात आपला अहवाल सादर करणार असून, अहवालाच्या आधारे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यासह संबंधित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिले.

या प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी निवृत्त होऊनही पदावर का कायम आहेत? यासह विविध प्रश्नांची सरबत्ती विरोधी सदस्यांकडून करण्यात आली. चौकशी अहवालानंतरच या प्रकरणातील संपूर्ण चित्र स्पष्ट होणार असून, जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचे लक्ष या घडामोडीकडे लागले आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### मराठी शाळा समायोजन धोरणाविरोधात विद्यार्थ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा : शाळा बंदीचा निर्णय रद्द करण्याची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी:-** राज्य सरकारच्या मराठी शाळा समायोजन धोरणाच्या निषेधार्थ शुक्रवारी (दि. २७) जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांनी भव्य लॉन्ग मार्च काढत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. परभणी तालुक्यातील झरी येथून हजारो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा मोर्चा काढण्यात आला.

राज्य शासनाने कमी पटसंख्येच्या सुमारे १८ हजारांहून अधिक शाळा समायोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात येईल, अशी भीती आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. शिक्षण हक्क कायद्यानुसार घराजवळ शिक्षणाची सुविधा देणे ही शासनाची जबाबदारी असताना हा निर्णय शिक्षणाच्या मूलभूत हक्कावर गदा आणणारा असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

झरी येथील जिल्हा परिषद प्रशालेतून निघालेला मोर्चा खानापूर, जिंतूर रोडमार्गे नांदापूर, टाकळी कुंभकर्ण, धर्मापुरी, विसावा फाटा मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय परभणी समोरील आंदोलन मैदानावर पोहोचला. मार्गभर विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करत शासनाच्या निर्णयाचा निषेध व्यक्त केला. आंदोलनस्थळी सभेत रूपांतर होऊन विविध वक्त्यांनी शासनाच्या धोरणावर तीव्र टीका केली.

यानंतर जिल्हा परिषद परभणी चे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. शाळा समायोजनाचा निर्णय तात्काळ रद्द करावा, रिक्त पदांवर शिक्षक भरती करावी, शिक्षणाचे खाजगीकरण थांबवावे तसेच शाळांना आवश्यक निधी व मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा प्रमुख मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

### पंचायत समिती सभापती-उपसभापतींची १० मार्चला होणार निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सर्व नऊ पंचायत समित्यांच्या सभापती व उपसभापती पदांसाठी निवड बैठक येत्या १० मार्च रोजी आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी संबंधित निर्देश जारी केले आहेत.

पंचायत समिती परभणी येथे उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले पिठासीन अधिकारी राहणार आहेत. पंचायत समिती जिंतूर येथे शैलेश लाहोटी, पंचायत समिती सेलू येथे उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, तर पंचायत समिती पाथरी येथे उपविभागीय अधिकारी संगीता चव्हाण तावदरे पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. पंचायत समिती मानवत येथे अरुणा संगेवार, पंचायत समिती सोनपेठ येथे रतनसिंग साळोक, पंचायत समिती गंगाखेड येथे जीवराज डापकर, पंचायत समिती पालम येथे विद्या मुंडे-केंद्रे, तर पंचायत समिती पूर्णा येथे प्रतिभा गोरे पिठासीन अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. सर्व संबंधित पंचायत समित्यांच्या सभागृहात १० मार्च रोजी दुपारी २ वाजता निवड प्रक्रिया पार पडणार आहे.

### विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवून पुढे जावे : अतुल देशपांडे : मराठवाडा हायस्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**परभणी,/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवून अभ्यासू वृत्तीने पुढे जावे, असे आवाहन अतुल देशपांडे केले.

नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा हायस्कूलच्या शिवाजी नगर शाखेत शनिवार २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून अतुल देशपांडे उपस्थित होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव संतोष धारासुरकर तर सहसचिव तथा मुख्याध्यापक/प्राचार्य अनंत पांडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी पर्यवेक्षक सूर्यकांत पाटील, सहपर्यवेक्षक सुनील रामपूरकर, नंदकिशोर साळवे, इयत्ता ९ वी 'क' चे वर्गशिक्षक विनोद लोलगे यांचीसह उपस्थिती लाभली.

प्रमुख वक्ते देशपांडे यांनी विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. विज्ञानातून उन्नती करा, प्रगती करा आणि विज्ञानात जगा, असा संदेश देत त्यांनी विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व स्पष्ट केले. मोबाईलचा अतिवापर टाळण्याची गरज अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवून अभ्यासू वृत्तीने पुढे जावे, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात धारासुरकर यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान दिनाच्या सविस्तर शुभेच्छा देत विज्ञान विषयाचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूर्यकांत पाटील यांनी केले. यावेळी महान भारतीय शास्त्रज्ञ सी.व्ही. रमन यांच्या कार्याची सविस्तर माहिती देण्यात आली. त्यांच्या संशोधनामुळे भारताला जागतिक पातळीवर मिळालेला सन्मान विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरला. इयत्ता पाचवी 'ब'च्या वर्गशिक्षिका सौ. स्वाती शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली 'विज्ञानाने शिका' हे गीत सादर करून वातावरणात उत्साह निर्माण केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी सायली भगत व कुमारी सांची धबाले यांनी प्रभावीपणे केले. विज्ञान दिनानिमित्त इयत्ता पाचवी 'ब'ची कुमारी आंचल राठी, कुमारी रावी ढवळे, अशविन सराफ, पृथ्वीराज मुंजे तसेच इतर वर्गातील कुमारी जोया खान, साक्षी नारायणकर, अलकिषा शेख, निशा खंदारे, कनिष्का खंदारे, आसमा शेख, नव्या समिंद्रे, स्वराज कीर्तने आदी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांपैकी आर्या भोरे, नम्रता डहाळे, स्वप्निल पुरी झाली यांनी आकर्षक भिंतीपत्रके तयार केली होती. त्यांचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ. पूजा घोडे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी संसद सल्लागार श्रीपाद कुलकर्णी, शिवप्रसाद कोरे, अभिजीत कुलकर्णी तसेच विज्ञान विषयाचे शिक्षक विनोद लोलगे, सौ. जोशी, अविनाश कंधारकर, शिरीष कुर्तडीकर, सौ. स्वाती शेळके, सौ. घोडे, स्वप्निल पुरी, ठेंगडे, बिरादार, संतोष मोरे, राम बंडे आदींचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमानंतर सर्व वर्गांच्या विद्यार्थ्यांनी सुमारे शंभर विविध विज्ञान प्रयोगांची प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्रयोगांमधून विद्यार्थ्यांनी विज्ञानातील संकल्पना प्रभावीपणे मांडल्या. एकूणच राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहपूर्ण, प्रेरणादायी व ज्ञानसमृद्ध वातावरणात साजरा झाला.

### प्रभाग समिती 'अ' कार्यालयास उपमहापौर गणेश देशमुख यांची भेट

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेचे उपमहापौर गणेश देशमुख यांनी गुरुवारी दुपारी १२ वाजता प्रभाग समिती 'अ' कार्यालयास भेट देऊन विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी प्रभाग समिती कार्यालयाच्या वतीने सहायक आयुक्त जुबेर हाश्मी यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.यानंतर कर वसुली, स्वच्छता, विद्युत व पाणीपुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेण्यात आली. प्रभाग समितीमार्फत नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा तसेच अंतर्गत कामकाजाचा आढावा घेत अडचणी जाणून घेण्यात आल्या.

## परभणी जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्ष निवड १८ मार्चला


**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी विशेष बैठक येत्या १८ मार्च रोजी दुपारी २ वाजता जिल्हा परिषद सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक पिठासीन अधिकारी शोभा जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी शुक्रवारी (दि. २७) जारी केली.

सन २०२२ मध्ये परभणी जिल्हा परिषदेची मुदत संपल्यानंतर काही काळ प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने नुकत्याच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका पार पाडल्या. नव्याने निवडून आलेल्या सदस्यांमधून आता अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवड होणार आहे.

## जीवन समृद्ध ज्ञानसंपन्न करण्यासाठी ग्रंथाशी मैत्री महत्त्वाची- खटाणे

**बोरी/प्रतिनिधी -** : आयुष्यात यशस्वी आणि दुरदृष्टी ठेवून वाटचाल करण्यासाठी वाचन संस्कार महत्वाचा. आपण शालेय जीवनापासून ग्रंथ मैत्री जपली पाहिजे कारणं ग्रंथ हे माणसाला सुसंस्कृत आणि संस्कारक्षम बनवतात. ग्रंथ ज्ञान संपन्न करतात आणि व्यक्तिमत्त्व विकास घडवण्यासाठी अत्यंत मोलाचे योगदान देतात . वक्तृत्व आणि वाचन संस्कार यांच्या अत्यंत महत्वाचा भाग म्हणजे स्वभाव धिटपणा निर्माण करतात. त्यामुळे समाजात वेगळी प्रतिमा आणि प्रतिभा उमटविण्याचं काम ग्रंथ करतात.विद्यार्थी दशेत वाचन संस्कार अंगिकारला पाहिजे तरच तुम्ही जीवनात यशस्वी होऊ शकता. असं जय भवानी सार्वजनिक वाचनालय गुळखंड ता.पालम येथील एका कार्यक्रमाप्रसंगी उद्घाटनप्रसंगी शेषराव खटाणे सहाय्यक पोलिस निरीक्षक पालम हे बोलतं होते.

पुस्तक माणसाचं मस्तक सशक्त करतात प्रामाणिक माणूस घडवण्यासाठी ग्रंथ वाचन मोलाचे असते. वाचकांना आवडलेले पुस्तक देण्यासाठी आम्ही प्रामाणिक सेवा देत असतोत . वाचकांनी देखील तेवढीच तत्परता दाखवली पाहिजे. वेळेचं नियोजन करून वाचन संस्कार जपण्यासाठी वेळ दिला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज हे कष्टप्रद प्रवास करत जनतेच्या हितासाठी अहोरात्र विचार करत मोठे झाले. आज आपल्या सहज आधुनिक तंत्रज्ञान विकसित झाले आहे त्याचा सदुपयोग करून ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या जाव्यात असं अध्यक्षीय समारोप प्रसंगी जीवनराव लोखंडे बोलत होते.




जय भवानी सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने दरवर्षी शिवजयंती निमित्त देण्यात येणारा उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार प्रदान करण्यात येतो . सन २०२४-२०२५ पुरस्कार सेलू ता.सेलू येथील स्वामी रामानंद तीर्थ हिंदी मराठी ग्रंथालयाचे ग्रंथपाल महादेव माणिकराव आगजाळ यांना तर सन : २०२५ -२०२६ चा बोरी ता.जिंतुर येथील जयकुमार जैन सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल नेमिनाथ जयकुमार जैन यांना देण्यात आला. पुरस्कारांचे स्वरूप सन्मानपत्र, सन्मान चिन्ह,शाल श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष जीवनराव लोखंडे उदघाटक शेषराव खटाणे सहाय्यक पोलीस निरीक्षक पालम सत्कार मुर्ती महादेव आगजाळ नेमिनाथ जैन पोलिस कॉन्स्टेबल सुदाम धुळगंडे, कोलमवार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाचनालयाचे अध्यक्ष बापुसाहेब पौळ, प्रास्ताविक कु. दुर्गा पौळ तर आभार ग्रंथपाल अर्जुन पौळ यांनी मानले .

याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर बालवाचक कु.सई , आराध्या, गीता,भक्ती, प्रतिक्षा, संध्या पौळ,प्रशिक जोंधळे.

उत्कृष्ट रोज वाचक व उत्कृष्ट ग्रंथ वाचक पुरस्कार पुढील प्रमाणे प्रदान करण्यात आले .वंश दिपक कांबळे, प्रशिक विकास जोंधळे, शिवशंकर यशवंत कटकमक्रे, सम्यक गौतम जोंधळे, क्रिश लक्ष्मण सरोदे कुं. अस्मिता श्रीहरी बिडकर ,स्नेहा संग्राम पोळ ,मनीषा रमेशराव पोळ इत्यादी. कार्यक्रमाला प्रतिष्ठित नागरिक किशनराव पौळ, सरपंच दत्तात्रय पौळ, व वाचक महिला वाचक,बालवाचक यांची उपस्थिती होती.

## रेल्वे सुरक्षा दलाची महिला कॉन्स्टेबल सौ.रमा शर्मा ने वाचवले वृद्ध प्रवाशाचे प्राण

**पूर्णा,/प्रतिनिधी :-** पूर्णा येथील रेल्वे स्थानकावरील रेल्वे सुरक्षा दल (),येथे ऑपरेशन जीवन रक्षा अंतर्गत २४ फेब्रुवारी मंगळावर रोजी एका वृद्ध प्रवाशाचा जीव वाचवून सतर्कता आणि धाडसाचे उत्तम जिवंत उदाहरण दाखवून दिले

दि. २४ फेब्रुवारी मंगळवार रोजी सायं. ०७.४५ वाजता महिला कॉन्स्टेबल सौ. रमा शर्मा बकल क्रमांक २३३७ या सकाळ शिफ्टमध्ये कर्तव्य बजावत होत्या.संध्याकाळी परभणी कडे जाणारी १७६१४ पनवेल एक्सप्रेस प्लॅटफॉर्म क्र. ०२ वर आल्यानंतर त्या संबंधित गाडीत ''मेरी सहेली'' या कार्यक्रमा अंतर्गत स्थानकावर कर्तव्यात होत्या. दरम्यान, गाडी सुटत असताना बाबुराव घाटगे (वय ७५ वर्षे) या वृद्ध प्रवाशांनी धावत्या गाडीत चढण्याचा प्रयत्न केला. मात्र तोल जाऊन ते प्लॅटफॉर्म आणि धावत्या गाडीच्या



मधील धोकादायक जागेत पडण्याच्या स्थितीत आले, ज्यामुळे जीवितास गंभीर धोका निर्माण झाला.

ही परिस्थिती पाहताच सौ. रमा शर्मा यांनी आणि तेथील प्रवाशांनी अतुलनीय धैर्य, तत्परता व प्रसंगावधान दाखवत तात्काळ धाव घेतली आणि स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्या वृद्ध प्रवाशाला सुरक्षितरित्या बाहेर ओढून त्यांचा जीव वाचवला.

ऑपरेशन ''जीवन रक्षा'' अंतर्गत केलेल्या या शौर्यपूर्ण कृतीमुळे मोठा अपघात टळला असून आरपीएफच्या सतर्कता, कर्तव्यनिष्ठा व मानवतावादी सेवाभावाचे उत्कृष्ट उदाहरण समोर आले आहे.

संबंधित प्रवाशाने व त्यांच्या कुटुंबीयांनी आरपीएफ कर्मचाऱ्यांचे आणि तेथील मदत करणाऱ्या नागरिकांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

## सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणी सुनावणी आता चार मार्चला?

**परभणी,/प्रतिनिधी:** येथील सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणात गुरुवारी (दि. २६) उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात सुनावणी झाली. या सुनावणीत याचिकाकर्त्या मयत सोमनाथ सूर्यवंशीच्या मातोश्री विजयाताई सूर्यवंशी यांच्या वतीने ॲड. प्रकाश आंबेडकर हे बाजू मांडत आहेत. गुरुवारी झालेल्या सुनावणीत तांत्रिक कारणामुळे या प्रकरणी सुनावणी आता पुढील ४ मार्चला होण्याची शक्यता आहे.

गुरुवारी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती संदीपकुमार मोरे आणि न्यायमूर्ती आबासाहेब शिंदे यांच्या पिठासमोर अँड. प्रकाश आंबेडकर यांनी सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी युक्तिवाद केला. शासनाच्या वतीने या प्रकरणी मूळ दुरुस्ती अर्जावर म्हणणे सादर करण्यात येणार असल्याने तसेच दुरुस्ती अर्ज प्रलंबित असल्याने या प्रकरणी सुनावणी घेता येणार नाही, असे यावेळी खंडपीठाने स्पष्ट केले. त्यामुळे आता पुढील सुनावणी येत्या चार मार्च रोजी अपेक्षित आहे. शासनाच्या वतीने अतिरिक्त सरकारी वकील पवन लखोटिया यांनी युक्तिवाद केला.

दरम्यान, या प्रकरणी मागे झालेल्या सुनावणीत ॲड. आंबेडकर यांनी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी नोंदविलेल्या जबाबानंतर पुढील कार्यवाही कोणी करावी? याबाबत कायद्यात स्पष्ट तरतूद नसल्याचे सांगून कायद्यात स्पष्टता आणण्यासाठी गृहमंत्र्यांना येथे पाचारण करून कायद्यात दुरुस्ती करावी, असा युक्तिवाद केला होता.

## जिंतूरातील जिजामाता विद्यालयात भव्य विज्ञान प्रदर्शन

**परभणी ,/प्रतिनिधी:** शहरातील जिजामाता विद्यालय व डॉ. सुभाषचंद्र राठी बालक विद्या मंदिर येथे महान शास्त्रज्ञ सी. व्ही. रामन यांच्या कार्याचा गौरव म्हणून ता. २८ रोजी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे, प्रयोगशीलता वाढवणे आणि विज्ञान शिक्षण अधिक प्रभावी करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक मनोहर कदम होते. प्रमुख पाहुणे म्हणून गजानन तिखे, संस्थेच्या संचालिका पद्मा तोष्णीवाल तसेच कवी मयूर जोशी यांची उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनात इयत्ता ५ ते ९ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून साकारलेले २०० पेक्षा अधिक विज्ञान प्रयोग प्रदर्शनात मांडण्यात आले. या प्रयोगांमध्ये पर्यावरण संरक्षण, जलसंधारण, सौर व पवनऊर्जा, विद्युत ऊर्जा, मानवी शरीर रचना, प्रदूषण नियंत्रण, वाहतूक व्यवस्था, आधुनिक तंत्रज्ञान, रोबोटिक्स तसेच दैनंदिन जीवनातील विज्ञान या विषयांचा समावेश होता. या प्रदर्शनात श्रावणी काळे, अनिकेत चव्हाण,



साधना सोनवणे, सोहम कांगणे, श्रावणी रोकडे, अबोली देशमुख, कल्याणी गीते, प्रणिता दराडे, सोहम संगेकर,रुद्र कंठाळे, कल्याणी कांगणे या विद्यार्थ्यांनी सादर केलेले प्रयोग कौतुकास्पद होते. प्रत्येक प्रयोग विद्यार्थ्यांनी स्वतः तयार करून त्यामागील वैज्ञानिक तत्त्वे उपस्थितांना समजावून सांगितली. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, सादरीकरण कौशल्य आणि निरीक्षणशक्ती पाहून पालक, शिक्षक व नागरिकांनी समाधान व्यक्त केले. अनेक प्रयोगांनी समाजोपयोगी संदेश देत विज्ञान केवळ पुस्तकी न राहता प्रत्यक्ष जीवनाशी कसे जोडलेले आहे, हे अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक मनोहर कदम यांनी विज्ञान शिक्षणात प्रयोगांचे महत्त्व स्पष्ट करत, ''विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारण्याची सवय ठेवली तरच खऱ्या अर्थाने वैज्ञानिक विचारसरणी विकसित होईल,'' असे मत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे कौतुक करत, भविष्यात संशोधन क्षेत्रात करिअर करण्यासाठी अशा उपक्रमांचा मोठा उपयोग होतो, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेघराज मांडवगडे तसेच आभार प्रदर्शन प्रशांत तायडे यांनी केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. एकूणच, सी. व्ही. रामन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित हे विज्ञान प्रदर्शन विद्यार्थ्यांच्या सुप्त वैज्ञानिक क्षमतेला चालना देणारे ठरले असून, शहरातील शैक्षणिक व वैज्ञानिक वातावरण अधिक समृद्ध करणारा उपक्रम म्हणून या कार्यक्रमाकडे पाहिले जात आहे.

## अग्रलेख...

# प्रचार आणि उधळपट्टी

निवडणुका हा लोकशाही व्यवस्थेचा गाभा आहे. लोकशाही शासन व्यवस्थेत निवडणुका अपरिहार्य असतात. मात्र त्याचा सध्या अतिरेक झाल्यासारखे चित्र आहे. आपल्या अवाढव्य अशा देशात प्रत्येक दिवशी कोणती ना कोणती निवडणूक होत असते. मग ती ग्रामपंचायतीपासून राष्ट्रपतिपदापर्यंत कोणतीही राहू शकते. काही निवडणुका प्रत्यक्ष लढवल्या जातात, तर काही अप्रत्यक्षपणे. विधानसभा आणि लोकसभेची निवडणूक प्रत्यक्ष म्हणजे जनतेतून होत असते, तर विधानपरिषद आणि राज्यसभेची निवडणूक अप्रत्यक्षपणे लढवली जाते. काही ठिकाणी नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडला जातो. नगरसेवक आणि जि. प. सदस्य अनुक्रमे महापौर आणि जिल्हा परिषद अध्यक्षाची निवड करत असतात. यातील काही राज्य निवडणुका आयोगाच्या अखत्यारीत असतात तर विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा, राज्यसभा, उपराष्ट्रपती आणि राष्ट्रपतिपदाची निवडणूक केंद्रीय निवडणूक आयोगाला घ्यावी लागते.

निवडणुका लढवण्याची एक नशा असते. कारण निवडणूक लढवल्याशिवाय सत्तेचे आणि अधिकाराचे पद मिळत नाही. जनतेच्या सेवेसाठी आम्ही राजकारण करतो, असे सर्व राजकीय पक्ष व त्याचे नेते सतत म्हणत असले, तरी सत्तेशिवाय प्रभावीपणे जनतेची सेवा करता येत नाही, असा समज झाला आहे. हातात सत्ता नसली तर जनतेच्या प्रश्नासाठी तुम्हाला आंदोलन करावे लागते; मात्र सत्ता असली तर जनतेचे प्रश्न सोडविण्याची किल्ली तुमच्या हातात येते आणि सत्तेची किल्ली निवडणुका लढवल्याशिवाय तुमच्या हातात येऊ शकत नाही. तथापि, निवडणुका लढवणे हे आज सोपे राहिले नाही तर अतिशय खर्चिक आणि महागडे झाले आहे. तरीसुद्धा निवडणूक रिंगणात उतरणाऱ्यांची संख्या कमी झाली नाही. हे सारे आठवण्याचे कारण म्हणजे सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेली एक याचिका. 'कॉमन कॉज आणि सेंटर फॉर पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशन' या गैरसरकारी संस्थेने दाखल केलेल्या याचिकेत निवडणुकीत राजकीय पक्षांकडून होत असलेल्या अमर्याद खर्चावर मर्यादा घालण्याची मागणी करण्यात आली आहे. या याचिकेवर सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. विपुल पंचोली यांच्या खंडपीठाने केंद्र सरकार तसेच निवडणूक आयोगाला नोटीस बजावली आहे. लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम ७७(१) नुसार निवडणुकीत उमेदवारांनी प्रचारासाठी खर्च करण्यावर मर्यादा आहे. मात्र ही मर्यादा खरोखर पाळली जाते का? आपण ठरवून दिलेल्या मर्यादेत खर्च होतो का, हे पाहण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची असली, तरी निवडणूक आयोग ती जबाबदारी प्रभावीपणे पार पाडते का, हा संशोधनाचा आहे. आयोगाने खर्चाची जी मर्यादा ठरवून दिली, त्याच्या किमान १० पट खर्च निवडणुकीत उमेदवारांकडून होत असतो. उमेदवार आपल्या प्रचारावर करीत असलेला खर्च वेगळा आणि राजकीय पक्ष आपल्या उमेदवारांच्या प्रचारावर करीत असलेला खर्च वेगळा असतो. राजकीय पक्षांसाठी खर्चाची कोणतीच मर्यादा ठरविण्यात आलेली नाही, याकडेच याचिकेतून लक्ष वेधण्यात आले आहे. निवडणुकीच्या प्रचारात पैशाची उधळपट्टी केली जाते, पाण्यासारखा पैसा खर्च केला जातो, ते पाहून सर्वसामान्य माणसाचे डोळे फाटू शकतात. त्यामुळे आज निवडणूक लढवणे हे सर्वसामान्य माणसाचे नाही, तर ते धनाढ्यांचे झाले आहे. देशातील निवडणूक प्रणालीला तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त टी. एस. शेषन यांनी वळण लावले. त्याआधी निवडणुका म्हणजे नुसता सावळागोंधळ होता, कोणत्याही प्रकारचे निर्बंध राजकीय पक्ष आणि त्यांच्या उमेदवारांवर नव्हते. प्रचाराची वेळ निश्चित नव्हती, रात्रभर प्रचार सुरू राहायचा. मात्र, शेषन यांनी प्रचारासाठी रात्री १० पर्यंतची वेळ निश्चित केली. रात्री १० नंतर प्रचारावर बंदी आणली. निवडणूक खर्चाची मर्यादाही त्यांनी तेव्हा ठरवून दिली. आपण प्रचारात दररोज काय खर्च करतो, याचा अहवाल आयोगाला सादर करणे उमेदवारांवर बंधनकारक केले. त्यानुसार आपल्या देशातील निवडणूक प्रणालीला शिस्त आणि काहीसे वळण लागले, असे म्हणायला हरकत नाही. आपल्या देशात मुख्य निवडणूक आयुक्त हे पद आहे. त्या व्यक्तीला काही अधिकारही असतात आणि मनात आणले तर तो देशातील सर्व राजकीय पक्षांचे कान पिरगाळू शकतो, हे शेषन मुख्य निवडणूक आयुक्त झाल्यानंतरच देशातील जनतेला समजले.

निवडणूक आयोग आज प्रचारातील खर्चाचे दर निश्चित करून देते. यात चहा, कॉफी, नाश्ता, दोन्ही वेळचे जेवण, मांसाहारी जेवण, प्रचारातील गाडीचा प्रतिकिमी दर, मंडप, लाऊडस्पीकर, झेंडे, पोस्टर आणि पत्रक याचा दर ठरविला जातो. एक काळ असा होता, जेव्हा कार्यकर्ते आपले घरचे खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजत होते, म्हणजे राजकीय पक्षांचे काम करीत होते. आता परिस्थिती बदलली आहे. आपण उमेदवाराचा प्रचार करतो, म्हणजे त्याच्यावर उपकार करतो असे मानत, त्यामुळे त्याने आपला दिवसभराचा सगळा खर्च केला पाहिजे, अशी कार्यकर्त्यांची मानसिकता झाली आहे. आता दारू आणि मांसाहारी जेवणाशिवाय कार्यकर्ते कामच करत नाही. याशिवाय त्यांच्या खिशातही काही टाकावे लागते. कोणत्याही निवडणुकीत दोन प्रकारचे खर्च होत असतात. एक म्हणजे उमेदवार करतो तो खर्च आणि राजकीय पक्ष आपल्या उमेदवारांच्या प्रचारावर खर्च करतो तो खर्च. पक्षाचा सामायिक खर्च असतो, तो उमेदवाराच्या प्रचार खर्चात धरला जात नाही. आज छोटे पक्ष वगळले तर बहुतांश मोठ्या पक्षाचे सर्वच नेते प्रचारासाठी हेलिकॉप्टर आणि चार्टर्ड विमानातून फिरत असतात. कमीत कमी वेळात जास्त प्रचारसभा घेता याव्या म्हणून हे करावे लागते. आज निवडणुकीच्या प्रचारात असणारी सर्वच नेते आणि कार्यकर्ते चार्टर्ड विमानातून फिरतात आणि पंचतारांकित हॉटेलात राहात असतात. हा खर्च पक्षाचा खर्च मानला जातो.

आज नगरसेवकपदाचा एक उमेदवारही काही लाख रुपये प्रचारावर खर्च करीत असतो. जिल्हा परिषद, नगर परिषद, पंचायती निवडणूकही तशीच. विधानसभा आणि लोकसभेच्या उमेदवाराचे खर्चाचे आकडे पाहिले तर डोळे फिरतील. निवडणुकीत जो पैसा खर्च केला जातो, तो बहुतांश काळा पैसा असतो. कारण या पैशाचा काही हिशेब नसतो. गेल्या काही वर्षांत आपल्या देशातील निवडणूक प्रणालीत एका अनिष्ट परंपरेचा शिरकाव झाला आहे, ती म्हणजे मतदारांना भेटवस्तू वा रोख रक्कम देणे. खरं म्हणजे ही एक प्रकारची लाचच झाली. मतदारांना आपल्या पक्षाची विचारधारा सांगून त्यांचे मत परिवर्तन करण्यापेक्षा त्यांचे मत विकत घेण्याकडे आज सर्व राजकीय पक्षांच्या उमेदवारांचा कल झाला आहे. विशेष म्हणजे यात काही गैर आहे, हे जसे उमेदवारांना वाटत नाही; तसेच उमेदवारांकडून पैसे घेण्यात आपण काही चूक करतो, असे मतदारांना वाटेनासे झाले आहे. मतदान करणे हा आता दोन्ही बाजूने सरळसरळ व्यवहार झाला आहे. सरकारी कार्यालयात लाच देऊन कामे केली जातात. निवडणुकीत पैसे वाटून मतं विकत घेतली जातात. निवडणुकीत जो पैसा वापरला जातो, तो बहुतांश काळा पैसा असतो. काळ्या पैशाचा प्रभाव रोखण्यासाठी निवडणुका लढवण्यासाठी सर्व राजकीय पक्षांना सरकारने पैसे उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी अजूनही केली जात आहे. काही देशात असा प्रकार केला जातो. त्यामुळे सरकारने या मागणीवर गांभीर्याने विचार करायला हरकत नाही.

सर्व प्रकारच्या निवडणुकीच्या प्रचारावर होणारा खर्च काही हजार कोटींचा असतो. एवढ्या पैशात देशात कितीतरी विकास कामे होऊ शकतात, देशाचा चेहरामोहरा बदलू शकतो. आपल्या देशात वर्षभर निवडणुका सुरू असतात, निवडणुकांसाठी आचारसंहिताही लागू होत असते. त्यामुळे विकास कामे ठप्प होऊन जातात, सरकारला काही काम करता येत नाही. नोकरशाहीला काम न करण्याचे निमित्तच हवे असते. याला आळा घालण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी 'एक देश एक निवडणूक' या संकल्पनेचा आग्रह धरून आहेत. ही संकल्पना व्यापक समाजहित आणि देशहिताचीही आहेत. राजकीय पक्षांच्या निवडणुकीतील खर्चावर मर्यादा आणण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने योग्य तो निर्णय घेतला पाहिजे, सद्यस्थितीची ती गरज म्हटली पाहिजे. ▮

## विशेष

**डॉ. राजकुमार अवसरे**

# विज्ञान शिक्षण संस्थेची वाटचाल

### २८ फेब्रुवारी; राष्ट्रीय विज्ञान दिन विशेष

२१व्या शतकात विज्ञान व तंत्रज्ञान हे केवळ शिक्षणाचे विषय न राहता मानवी जीवनाची दिशा ठरवणारे मूलभूत घटक बनले आहेत. समाजाचा बौद्धिक विकास, आर्थिक प्रगती, पर्यावरणीय समतोल आणि सामाजिक परिवर्तन विज्ञानाधारित विचारसरणीवर अवलंबून आहेत. राज्य विज्ञान शिक्षण संस्थेचा उद्देश केवळ माहिती देणं नसून विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण करणे, प्रश्न विचारण्याची सवय लावणे, तर्कशुद्ध विचार विकसित करणे आणि समस्यांकडे वैज्ञानिक दृष्टीने पाहण्याची क्षमता घडविणे हा असतो. विज्ञान शिक्षण समाजघडणीचे प्रभावी साधन म्हणून विकसित करण्यासाठीराज्य विज्ञान शिक्षण संस्था महत्त्वाची भूमिका बजावत आहे. विज्ञान शिक्षणाला दिशा देणारी, धोरण ठरवणारी व प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारी ही एक अग्रगण्य शैक्षणिक यंत्रणा असून शालेय स्तरावर विज्ञान शिक्षण अधिक प्रयोगशील, जीवनोपयोगी आणि समाजाभिमुख बनवणे तसेच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवून जबाबदार नागरिक घडवणे, हे मूलभूत कार्य आहे. त्यामुळे राज्य विज्ञान शिक्षण संस्था विज्ञानाधारित समाजनिर्मितीची एक सशक्त चळवळ म्हणून ओळखली जाते.

१९६८ मध्ये पुणे येथे राज्य विज्ञान शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. प्रारंभी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद अंतर्गत कार्यरत होती. १९८० पासून विज्ञान शिक्षण अधिक व्यापकपणे राज्याच्या विविध भागांपर्यंत पोहोचावे या उद्देशाने संस्थेचे विकेंद्रीकरण करण्यात आले. त्यानुसार संस्थेचे नागपूर येथे स्थलांतर करण्यात आले. या बदलामुळे विदर्भ, मराठवाडा, खानदेश व ग्रामीण भागातील विज्ञान शिक्षणाला विशेष चालना मिळाली. पुढे १७ ऑक्टोबर २०१४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील शैक्षणिक प्रशासन अधिक प्रभावी करण्यासाठी पाच प्रादेशिक विद्या प्राधिकरणांची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये नागपूर येथील राज्य विज्ञान शिक्षण संस्था प्रादेशिक विद्या प्राधिकरण (विज्ञान) म्हणून घोषित करण्यात आली.

या टप्प्यापासून संस्थेची भूमिका अधिक व्यापक, धोरणात्मक व परिणामकारक झाली. राज्यातील विज्ञान शिक्षणाचे नियोजन, समन्वय, अंमलबजावणी व मूल्यांकन करण्याची जबाबदारी या संस्थेकडे आली. काळानुरूप बदल स्वीकारून विज्ञान शिक्षणाला नवी दिशा देणारी गतिमान



आणि परिवर्तनशील संस्था म्हणून विकसित झाली. संस्थेची दृष्टी ही पारंपरिक, परीक्षा केंद्रित शिक्षणाच्या चौकटीपलीकडे जाणारी असून ती समाजपरिवर्तनाभिमुख विज्ञान शिक्षण घडवण्यावर केंद्रित आहे. विज्ञान शिक्षण अधिक अनुभवाधारित, प्रयोगशील, जीवनाशी निगडित आणि समाजोपयोगी बनवण्यावर भर दिला जातो. दैनंदिन जीवनातील प्रश्न, पर्यावरणीय आव्हाने, आरोग्यविषयक समस्या आणि तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर यांच्याशी जोडले जावे, ही संस्थेची प्रमुख भूमिका आहे. संस्थेची उद्दिष्टे व्यापक, बहुआयामी आणि दीर्घकालीन स्वरूपाची असून ती शैक्षणिक व सामाजिक गरजांशी सुसंगत आहेत. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर विज्ञान शिक्षणाचा दर्जा उंचावणे, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया अधिक परिणामकारक बनवणे आणि विज्ञान शिक्षणाला व्यवहार्य व जीवनोपयोगी स्वरूप देणे, हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे. यासोबतच शिक्षकांचे विषयज्ञान, अध्यापन कौशल्य, मूल्यमापन तंत्र आणि व्यावसायिक आत्मविश्वास वृद्धिंगत करणे हेही ध्येय आहे. विज्ञान शिक्षणाची गुणवत्ता ही शिक्षकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असते, या भूमिकेतून शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक नवोपक्रम आणि कृती संशोधनाला चालना दिली जाते तसेच समाजामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे, अंधश्रद्धा व अवैज्ञानिक समजुतींना तर्कशुद्ध विचारांनी आव्हान देणे आणि विज्ञान शिक्षणाला सामाजिक विकासाशी जोडणे केंद्रस्थानी आहे. राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक धोरणे, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील नव्या घडामोडी तसेच राज्याच्या सामाजिक-भौगोलिक गरजा यांचा समन्वय साधून विज्ञान शिक्षणाची दीर्घकालीन दिशा निश्चित करणे, ही भूमिका आहे. एनसीईआटी, डीएसटी, एनसीएसएम यांसारख्या राष्ट्रीय संस्थांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा अभ्यास करून त्यांचे राज्यस्तरीय रूपांतर केले जाते; जेणेकरून ही धोरणे प्रत्यक्ष शाळा आणि वर्गखोलीपर्यंत परिणामकारकरीत्या पोहोचू शकतील. ग्रामीण, आदिवासी व दुर्गम भागांतील विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञान शिक्षण समानतेने पोहोचावे, यासाठी धोरणात्मक उपाययोजना राबविल्या जातात. वैज्ञानिक विकास घडविण्यासाठी विविध अभिनव उपक्रम राबवते. विज्ञान प्रदर्शन, विज्ञान मेळावे, विज्ञान नाट्योत्सव, विज्ञान मंच, अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा आदी उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, सर्जनशीलता, नवोन्मेष क्षमता आणि संशोधन वृत्ती विकसित केली जाते.

गुणवत्तापूर्ण विज्ञान शिक्षणासाठी सक्षम, अद्ययावत आणि प्रेरित शिक्षक असणे अत्यावश्यक असून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांसाठी विषयज्ञान वृद्धिंगत करणारे, प्रयोगाधिष्ठित अध्यापन, आधुनिक अध्यापन पद्धती आदींवर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम सातत्याने आयोजित केले जातात. शिक्षकांच्या व्यावसायिक विकासातूनच विज्ञान शिक्षणाची गुणवत्ता उंचावते, या तत्त्वज्ञानावर संस्था कार्य करते. राज्य विज्ञान शिक्षण संस्था राज्यात विज्ञान संस्कृती रुजवण्याचे व्यापक कार्य करते. विज्ञान नाटक, विज्ञान प्रदर्शन, विज्ञान मेळावे, जनजागृती शिबिरे, व्याख्याने आणि संवादात्मक उपक्रमांच्या माध्यमातून विज्ञान सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाशी जोडले जाते. यामुळे विज्ञान ही केवळ अभ्यासाची शाखा न राहता समाजाच्या प्रगतीचे प्रभावी साधन ठरते. या उपक्रमांमुळे अंधश्रद्धा, गैरसमज आणि अवैज्ञानिक समजुतींना तर्कशुद्ध विचारांनी आव्हान दिले जाते. विज्ञान संस्कृती निर्माण करण्यामध्ये राज्य विज्ञान शिक्षण संस्थेचे योगदान सामाजिक व सांस्कृतिक स्तरावरही अत्यंत मोलाचे ठरते. संस्थेचे कार्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही असून राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना संधी मिळते. जवाहरलाल नेहरू विज्ञान प्रदर्शन, अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा आणि विविध विज्ञान स्पर्धांमध्ये सहभाग आणि यश हे राज्य विज्ञान शिक्षण संस्थेच्या मार्गदर्शनाचे फलित आहे. एकूणच राज्य विज्ञान शिक्षण संस्था विज्ञान शिक्षणाच्या प्रवासाची दिशा ठरवणारी, त्याला आशय देणारी आणि भविष्याकडे नेणारी एक सशक्त शैक्षणिक चळवळ आहे, असे म्हणता येईल. ▮

९३२५८४४५२४

(लेखक राज्य विज्ञान संस्थेचे संचालक आहेत.)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# पांढरा नव्हे तपकिरी कापूस!

आपल्या देशात कापूस उत्पादनाचा उण्यापुऱ्या पाच हजार वर्षांचा इतिहास आहे. केवळ पांढराच नाही तर कथ्था, हिरवा आणि फिकट गुलाबी रंगाचा कापूस भारतात तयार होत असे. त्यात विविध रंगसंगती करून दर्जेदार कापड निर्मिती होत असे. यांत्रिक शोधांच्या क्रांतिकारी प्रवाहात स्थानिक बियाणे आणि शेतकऱ्यांचे कौशल्य मागे पडून, पांढऱ्या कापसाला विविध रंगांचा डाय करणे अंगवळणी पडले आहे.

कापड उद्योगांमध्ये सर्वाधिक पाणी कापडाला विशिष्ट रंग देण्यासाठी वापरलं जातं. जगातील औद्योगिक जल प्रदूषणाच्या २० टक्के प्रदूषणासाठी हा उद्योग जबाबदार आहे. जगातील एकूण कार्बन उत्सर्जनापैकी १० टक्के उत्सर्जन यातून होतं. युनायटेड नेशन्स इनव्हायर्नमेंट प्रोग्रामनुसार, शेतातील कापूस ते तयार जीन्स पँट या प्रवासासाठी तब्बल ३७८१ लिटर पाणी लागतं. हे ३३.४ किलोग्रॅम कार्बन उत्सर्जनाच्या बरोबर आहे. एका जीन्स पँटला इतकं एकूण कापड उद्योगासाठी किती पाणी खर्च होत असेल? अमेरिकेतील नॉन प्रॉफीट रिसर्च सेंटर, वर्ल्ड इन्स्टिट्यूटच्या मते, कापड उद्योगांना दरवर्षी कापड रंगविण्यासाठी अंदाजे पाच ट्रिलियन लिटर पाणी लागतं. हे रसायनयुक्त डाय मिश्रित प्रदूषित आणि बहुतांश वेळा कोणतीही प्रक्रिया न करता नैसर्गिक जलस्रोतांमध्ये सोडले जाणारे पाणी प्रदूषण सोबत घेऊन प्रवाहित होत राहते. पण, रंगीत कापडासाठी आपण निसर्गावर प्रदूषणाचं काळं फासतोय, याचा विसर पडला. पण, नागपूरच्या केंद्रीय कापूस संशोधन केंद्रातील संशोधकांनी मात्र याची आठवण ठेवून कापड निर्मितीला इको फ्रेंडली करण्यासाठी दमदार पाऊल टाकले. कापड उद्योगातील हे प्रदूषण कमी करण्यासाठी नागपूरच्या केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या मुख्य शास्त्रज्ञ डॉ. विनीता गोतमारे आणि त्यांच्या चमूने शेतात थेट रंगीत कापूसच पिकविण्याचे यशस्वी संशोधन केले आहे. गेल्या २५ वर्षांपासून कापसाच्या विविध वाणांवर संशोधन करणाऱ्या डॉ. विनीता यांनी कपाशीच्या जंगली प्रजातींचा वापर करून नैसर्गिकरीत्या तपकिरी (ब्राऊन) रंगाच्या कापसाचं वाण शोधून काढलं आहे. रंगीत कापसाचे चार भारतीय वाण सध्या हातात आले असून त्याचं बियाणं शेतकऱ्यांनाही देण्यात आले आहे. कापसाच्या जंगली वाणासोबत क्रॉसिंग करून नवीन वाण तयार करताना रंगीत कापसाचे काही डेरिव्हेटिव्हज त्यांना मिळाले. या कापसाचं व्यावसायिक महत्त्व बघता त्याला स्टेबल करणं गरजेचं आहे, हे लक्षात घेऊन रंग फिका पडू नये यासाठी त्यांचे भगीरथ प्रयत्न सुरू झाले. त्यांनी हिरूसुटम, थर्बेरी, बारबाडन्स आणि रायमोंडी या जंगली जातींचा क्रॉस करून त्यामधून प्रोजिन्स मिळविले. डॉ. गोतमारे आणि कापूस संशोधन संस्थेच्या टीमने वर्ष २०१३ मध्ये वैदेही ९५ जेनेटिक स्टॉक म्हणून रजिस्टर केला. हे वाण गडद तपकिरी रंगाचे आहे. हे भारतीय रंगीत कापसाचे वाण जंगली जातींपासून मिळविलेले आहेत आणि हेच याचं वेगळेपण आहे. या कापसाला रासायनिक फवारणीची गरज नाही. पांढऱ्या कापसापेक्षा याचं उत्पन्न कमी असले, तरी सेंद्रिय फवारणीमध्येच याचे उत्पन्न होते. तपकिरीला पांढऱ्या कापसापेक्षा जास्त भाव मिळतो. माणसाकडून पर्यावरणाची होणारी हानी कमी करण्यासाठी हा कापूस महत्त्वाचा आहे. आणखी रंगीत कापूस आल्यास टेक्सटाईल इंडस्ट्रीमधील प्रदूषण कमी होईल.

या कापसाच्या उत्पादनासाठी फक्त पावसाच्या पाण्याची गरज असते. नंतर या कापसापासून कापड तयार होईपर्यंत याला कुठल्याही रसायनाची किंवा पाण्याची गरज नसते. हा कापूस नैसर्गिकरीत्या रंगीतच असल्याने कुठल्याही प्रकारचा डाय करायची किंवा धुवायला ब्लिंचिंगची गरज नाही. या पर्यावरणस्नेही कापसाचा प्रचार-प्रसार वाढायला निश्चित धोरणाची गरज आहे. मायबाप सरकारने संशोधकांच्या प्रयत्नांना समर्थ हातभार लावला तर शेतकरीही कापूस पिकविण्यासाठी पुढाकार घेतील. सध्या उत्पादित होणारा हा रंगीत कापूस फक्त तपकिरी रंगामध्ये उपलब्ध आहे. यामध्ये वेगवेगळे शेड्स आहेत. विदर्भाच्या उन्हात या कापसाचा रंग फिका न पडता आणखी गडद होतो, असं डॉ. विनीता यांच्या संशोधनात स्पष्ट झाले आहे. तपकिरी रंग स्टेबल करण्यात यश मिळालं. आता इतर रंग स्टेबल करून त्या रंगाचा कापूस घेता येईल का? यावर डॉ. विनीता यांचे संशोधन सुरू आहे. हा तपकिरी कापूस सध्या फक्त हातमागासाठी वापरला जातो कारण याच्या लांबी-रुंदीच्या मर्यादा आहेत. हाय स्पीडमशिनसाठी हा कापूस कसा वापरता येईल, यासाठीच्या डॉ. गोतमारे यांच्या संशोधनाला लवकरच यश मिळेल. भविष्यात आणखी सुधारित वाण तयार झालं तर पर्यावरणाच्या दृष्टीनं नव्या भारतातील आमूलाग्र बदलांची ती नांदीच ठरणार आहे. ▮

९८५०३३९२४०

## मुंबई वार्तापत्र


**नागेश दाचेवार**

# सातवी जागा, सातवा डाव!

इतिहासापासून आपण काय शिकतो? तर काहीच नाही, हे वाक्य अनेकदा उद्धृत केले जाते. पण महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जे घडत आहे, ते पाहिल्यावर या वाक्याची प्रचीती पुन्हा एकदा येते. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांतील धडे, टक्केवारीतील किरकोळ फरक, मागील काळात राज्यसभा आणि विधान परिषदेच्या निवडणुकीत देवेंद्र फडणवीसांनी केलेली मतांची बेगमी रणनीती आणि त्याअंती आलेला निकाल हे सगळं डोळ्यासमोर असताना महाविकास आघाडी आणि विशेषतः उबाठात पुन्हा तेच जुने डावपेच खेळले जाताना दिसत आहेत. त्यामुळे आता या सातव्या जागेवर सातवा डाव कोण टाकतो, हा खरा प्रश्न आहे.

२०२२ च्या सहा जागांसाठी झालेल्या राज्यसभा निवडणुकीत महायुतीच्या दोन जागा विजयी होण्याएवढं संख्याबळ त्यांच्याकडे होतं. सहाव्या जागेसाठी आवश्यक असलेलं हक्काचं संख्याबळ नव्हतं. देवेंद्र फडणवीसांनी आपले राजकीय कौशल्य दाखवत, अचूक रणनीतीच्या आधारावर सहावा उमेदवार निवडून आणला होता आणि याच निवडणुकीत संजय राऊत हे काठावर पास झाले होते. त्यांना आवश्यक असलेला ४१ चा कोटाच प्राप्त करता आला होता. एक मतं जरी कमी पडलं असतं तर राऊत बाद झाले असते. त्यावेळी नारायण राणेंसह काही नेते उपहासाने बोलत होते, "तुम्ही बघा एक संजय पडेल म्हणून..." पण नशीब बलवत्तर हे संजय बचावले आणि संजय पवार या शिवसेनेच्याच उमेदवाराचा बळी गेला होता. त्यापाठोपाठ २०२२ मध्येच विधान परिषदेच्या १० जागांसाठी निवडणूक झाली. महायुतीकडे चार जागा जिंकण्याएवढं संख्याबळ होतं. मात्र, भाजपाचे पाच उमेदवार निवडून आले. यावेळी काँग्रेसचे पहिल्या क्रमांकाचे उमेदवार चंद्रकांत हंडोरे पराभूत झाले होते. हा कटू अनुभव अलिकडल्या काळातलाच महाविकास आघाडीला आलेला आहे.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मिळालेलं यश हे भव्य असलं, तरी मतांच्या टक्केवारीतला फरक नगण्य होता. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील अंतर अर्ध्या-एक टक्क्याच्या आसपास होतं. त्याचाच अभ्यास करून महायुतीने विधानसभा निवडणुकीत मतदान वाढविण्यावर भर दिला आणि निकाल पालटले. दुसऱ्या बाजूला जागांच्या आकड्यांच्या भूलभुलय्यात अडकून वास्तवाचा अंदाज न घेण्याची चूक महाविकास आघाडीने केली. यावेळच्या राज्यसभा आणि विधान परिषद



निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर पुन्हा एकदा इतिहास समोर उभा असताना, यांची गती तीच दिसत आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या वाट्याला येऊ शकणाऱ्या एका राज्यसभा जागेवरून तीन पक्षांमध्ये चाललेली रस्सीखेच बघता, ही एक जागाही गमावून बसले तर त्यात आश्चर्य वाटण्याचं काही कारण नाही. महाविकास आघाडीसमोर प्रश्न आहे तो, सातवी जागा जिंकायची की घरातील लढाई?

**मातोश्रीवर सातव्या जागेची कुस्ती :** राज्यसभेची घोषणा होताच संजय राऊत यांनी जाहीरपणे शरद पवार यांचे नाव पुढे केले. महाविकास आघाडीचे सर्वात ज्येष्ठ नेते शरद पवार आहेत; त्यांनीच राज्यसभेत जावे, अशी भूमिका त्यांनी घेतली. गंमत म्हणजे पवारांच्या पक्षाकडून किंवा स्वतः पवारांकडून अधिकृत घोषणा नव्हती. सध्याच्या विधानसभेच्या संख्याबळावर अजून एक राज्यसभा निवडणूक होणार आहे. आज पवारांना पाठिंबा दिला, तर उद्या उबाठाच्या उमेदवाराला काँग्रेस आणि पवार गटाचा पाठिंबा मिळायलाच हवा, अशी अडेल भूमिका उबाठा यावेळी घेत आहे. उबाठा खेळत असलेल्या या खेळीतूनच खरा खेळ सुरू होत आहे. २०२८ मध्ये राऊत यांची राज्यसभेची मुदत संपणार आहे. त्या वेळी त्यांना पुन्हा निवडून यायचं असेल, तर महाविकास आघाडीची एकजूट आणि संख्याबळ आवश्यक असेल. पण आजच जर त्या जागेवर उबाठा शिवसेनेचा दावा कमजोर केला गेला, तर दोन वर्षांनी राऊत यांचा मार्ग मोकळा होऊ शकतो. याच पृष्ठभूमीवर आदित्य ठाकरे यांची भूमिका महत्त्वाची ठरते. राज्यसभेच्या संभाव्य उमेदवारीबाबत प्रियांका चतुर्वेदी यांचं नाव पुढे करण्याचा प्रयत्न हा केवळ एका नेत्याच्या पुनर्नियुक्तीचा प्रश्न आहे की अन्य काही हे आदित्य ठाकरेच जाणोत. पण एक गोष्ट खरी आज जर महाविकास आघाडीच्या नावाखाली उबाठाने स्वतःचा उमेदवार पुढे रेटला, तर उद्याच्या अर्थात राऊतांसाठी मजबूत दावा करता येणार नाही. परिणामी, राऊत यांचा गेम होऊ शकतो. मातोश्रीवरील हे अंतर्गत राजकारण नवीन नाही. आज इतिहासाची पुनरावृत्ती होत असल्याची दिसत आहे. उद्धव ठाकरेंकडून पक्षाची जबाबदारी आदित्यकडेच जाईल, हे निर्विवाद सत्य आहे. राज्यसभेच्या सातव्या जागेवरून सुरू असलेली जुंपण, हे सगळं एका मोठ्या राजकीय घडामोडींचा भाग असल्याचं जाणवतं. राऊत हे केवळ प्रवक्ते नाहीत, ते उद्धव यांचे रणनीतीकार आहेत आणि आघाडीतील समन्वयकही आहेत. अशा नेत्याला भविष्यातील समीकरणांतून बाहेर ठेवायचं असेल, तर त्याची सुरुवात जागेच्या दाव्यापासूनच होऊ शकते. एवढी राजकीय समज आदित्य ठाकरेंना आलेली दिसते. बरं, आदित्यसमोर संजय राऊत बोलू शकत नाही ही त्यांची कमजोरी नव्हे मजबुरी आहे. त्यामुळेच आदल्या दिवशी पवारच राज्यसभेवर जाती असा छातीठोक दावा करणारे राऊत यांनी लगेच आदित्य ठाकरेंचं बरोबर असल्याचं घुमजाव दुसऱ्या दिवशी केलं. यानिमित्तानं केवळ महाविकास आघाडीमध्येच नव्हे तर मातोश्रीवरही सुप्त संघर्ष सुरू आहे, हे उघड झालं.

राजकारणात विजय आणि पराभव दोन्हीचा अभ्यास करावा लागतो. जर प्रत्येक वेळी पराभवाचं खापर मतफुटीवर, ईव्हीएमवर किंवा सहयोगी पक्षांवर फोडलं, तर आत्मपरीक्षण होत नाही आणि आत्मपरीक्षणाशिवाय रणनीती बदलत नाही. आज राज्यसभेच्या सातव्या जागेवरून सुरू असलेली ही कुस्ती केवळ एका उमेदवाराची नाही. ती २०२८ च्या समीकरणांची, मातोश्रीवरील प्रभावाची आणि भविष्यातील नेतृत्वाच्या रचनेची चाचपणी आहे. राऊत आणि आदित्य यांच्यातील जुंपण ही वैयक्तिक राजकीय स्वार्थाची, अस्तित्वाची आहे. ▮

९२७०३३३८८६

### कीर्तनकार साहित्य संपदेचा वाहक

विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीची चर्चा जोरात आहे. अध्यक्षपदाचे उमेदवार आणि त्यांच्या गटांनी उमेदवारीच्या समर्थनार्थ त्यांचे दृष्टिकोन मांडले आहेत पण निरागस, दर्जेदार, सद्भिरुचिपूर्ण आणि परस्पर सद्भावनेतून समाजाला एकत्रित बांधून ठेवण्याचा परिणाम साधण्याची क्षमता असणाऱ्या वाङ्मयीन कृती समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवून साहित्याला सामाजिक चळवळ बनवू, असे आश्वासन कोणीही दिले नाही आणि ते बरोबरही आहे. कारण साहित्यिक केवळ साहित्याची निर्मिती करतो, पण तो त्याच्या कृतीचा वाहक नसतो. ते कार्य साहित्यिक चर्चा, अधिवेशने आणि संमेलनांच्या माध्यमातून होत असते. या उपक्रमांचा प्रभाव बहुधा शहरी आणि त्यातही काही विशिष्ट वर्गापुरता मर्यादित असतो. परिणामतः साहित्यिक चळवळ ही सार्वत्रिक लोकचळवळ न होता ठरावीक वर्गापुरती बंदिस्त बनली आहे. ही आजची स्थिती आहे. याउलट नगरवासींपासून ग्रामवासी आणि वनवासींपर्यंत अफाट पसरलेल्या भारतीय समाजाच्या जडणघडणीत रामायण, महाभारत आणि पौराणिक साहित्याचा मोठा भाग आहे, असे आपण मान्य करतो. म्हणजे साहित्य हे समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचले होते आणि सामाजिक सद्भावनेला व गुणवत्तेला बळ देणाऱ्या वाङ्मयीन कृती समाजाच्या आस्थेचा विषय बनल्या होत्या, असा त्याचा अर्थ होतो. असे साहित्य समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे कार्य जर कोणी केले असेल तर निर्विवादपणे असे म्हणावे लागते की, ते काम आपल्या कीर्तनकार-प्रवचनकारांनी केले आहे. तेच साहित्य संपदेचे वाहक आहेत. त्यामुळे हा वर्ग साहित्यिक चळवळीचा अविभाज्य अंग आहे; आज दुर्दैवाने तो दुर्लक्षित आहे, उपेक्षित आहे. कीर्तनकार व प्रवचनकार समाजाच्या सर्व स्तरात उपलब्ध आहेत. त्यांचा सर्वत्र संचार असतो, ते प्रतिभासंपन्न आहेत. अशांना प्रतिष्ठापूर्वक साहित्यिक चळवळीशी संलग्न करून त्यांच्या प्रतिभेचा उपयोग करून साहित्य प्रसाराला नवी दिशा व गती देता येणे शक्य आहे, असे वाटते.

**उषा दीक्षित**/९५५२०८२५६७

## वाचक पत्रे

### रामफळ : लागवडीकडे दुर्लक्ष



रामनवमीला रामफळ खरेदी करून मंदिरात रामाच्या मूर्ती समोर अर्पण करतात. खवय्यांना या रामफळाची महती कळू लागल्याने आवर्जून रामफळ खरेदी केले जात आहे. साधारणतः हृदयासारख्या आकाराचे, पिवळट, लालसर, थोडेसे हिरवट व चवीला गोड रामफळाची विक्री हातोहात होत असते. रामफळ (कस्टर्ड ॲपल) हे सीताफळाच्या जातीचे. वर्षभर बाजारपेठेत ही फळे मिळत नाहीत. पूजाअर्चा विधीत जशी अन्य फळे असतात, तसे रामफळ नसते. चवदार असूनही क्वचित लोक ते घेतात. शेतकऱ्यांनी रामफळाचे उत्पादन घ्यायचे ठरवले तर या मालाला बाजारपेठ आहे. बिब्बा, कवठ, सीताफळ, जांभूळ, रामफळांच्या लागवडीसाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ प्रयत्न करत आहे; मात्र, शेतकऱ्यांचा प्रतिसाद नसल्याने कोरडवाहू फळ पिकांच्या जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. रामफळही असेच एक दिवस नामशेष होऊन जाईल, अशी भीती कृषितज्ज्ञ व्यक्त करतात. राज्यात रामफळांच्या मोठ्या प्रमाणात बागा नाहीत. ग्रामीण भागात परसदारी किंवा शेतावर एखादे झाड असते. सरासरी सात वर्षाच्या एका झाडापासून वर्षाला १००-१५० फळे उत्पादन मिळते.

**नितीन दुर्बुडे** /९५०३६४८६३०

### स्त्रियांची तल्लख स्मृती

स्त्री ही प्रत्येक कुटुंबाचा महत्त्वाचा भाग असते. तिच्याशिवाय कुटुंब पूर्ण होत नाही. मग ती कोणत्याही रूपात असो. जसे आई, पत्नी, बहीण, आजी, आत्या, मावशी. एकच व्यक्ती वेगवेगळ्या टप्प्यावर या सगळ्या जबाबदाऱ्या लीलया पेलते. आज स्त्री समाजातील प्रत्येक क्षेत्रात प्रगतिपथावर आहे. ग्रामसेविकापासून राष्ट्रपती पदापर्यंत तसेच शिक्षिका, खेळाडू, डॉक्टर, पोलिस, पायलट, अशा सर्व क्षेत्रात ती आघाडीवर आहे. मात्र तिला देण्यात येणारे मानधन पुरुषापेक्षा कमी असते. ही बाब चित्रपटसृष्टीतही आढळून येते. नुकत्याच झालेल्या संशोधनात असे आढळून आले आहे की, स्त्री व पुरुष त्यांच्या मेंदूतील जैविक मंडलांची जोडणी वेगळ्या प्रकारची असते. त्यामुळे ती मल्टिटास्किंग करू शकते. स्त्रीची स्मृती जास्त तल्लख असते. नवरात्रात स्त्रीचा गौरव केला जातो. तिच्या शक्तीची पूजा केली जाते. जागतिक स्तरावर झालेल्या स्त्री-पुरुषांच्या मेंदूच्या अभ्यासाच्या संशोधनाच्या कामगिरीत तज्ज्ञ म्हणून एका भारतीय महिलेने काम केले आहे. ▮

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -०८८८८७४७६२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## कृषी पुरस्कारांसाठी आता घरबसल्या करा अर्ज

**बीड, २८ फेब्रुवारी** | राज्य शासनाच्या कृषी विभागाने पुरस्कारांची संपूर्ण प्रक्रिया डिजिटल केली असून, आता सन्मानाची ही वाट एका क्लिकवर सोपी झाली आहे. यापूर्वी कृषी पुरस्कारांसाठी अर्ज करताना शेतकऱ्यांना मोठी आर्थिक झळ सोसावी लागत होती. किचकट प्रक्रियेमुळे अनेक प्रयोगशील शेतकरी स्पर्धेबाहेरच राहायचे. हीच अडचण ओळखून आता ऑनलाइन संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली आहे. सन २०२५ पासूनचे सर्व कृषी पुरस्कार अर्ज आता ऑनलाइन प्रणालीद्वारेच स्वीकारले जाणार आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी, महिला आणि संस्थांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपले प्रस्ताव सादर करावेत. विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra. gov.in) जाऊन कृषी पुरस्कार या टॅबमध्ये आपले अर्ज सादर करता येतील. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण यांसारख्या मानाच्या पुरस्कारांचा समावेश आहे. मोबाइल किंवा संगणकावरून अर्ज करण्याची सुविधा. आर्थिक बचतः झेरॉक्स, फाइल्स आणि प्रवासाचा खर्च पूर्णपणे वाचणार. पारदर्शकताः आपला अर्ज कोणत्या पातळीवर प्रलंबित आहे, याची माहिती क्षणार्धात मिळेल.एकदा अपलोड केलेली कागदपत्रे पुन्हा पुन्हा देण्याची गरज उरणार नाही.

## परळी पोलिसांनी २.९७ लाखांचे १२ मोबाईल मूळ मालकांना केले परत

**बीड, २८ फेब्रुवारी** | परळी शहर पोलिसांनी तांत्रिक कौशल्याचा वापर करत तब्बल २ लाख ९७ हजार २०० रुपये किमतीचे १२ हरवलेले मोबाईल शोधून काढत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. शोधून काढलेले सर्व मोबाईल त्यांच्या मूळ मालकांकडे सुपूर्द करण्यात आले असून, त्यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. मोबाईल हरवल्यानंतर अनेक नागरिकांनी पोलिस ठाण्यात तक्रारी नोंदवल्या होत्या, तर काहींनी 'सीईआयआर' पोर्टलवर आपली माहिती नोंदवली होती. या तक्रारींच्या आधारे परळी शहर पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. पोलिस उपनिरीक्षक अमोल शिंगणे यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि तांत्रिक विश्लेषणाच्या माध्यमातून १२ मोबाईल हँडसेटचा शोध लावला. शोधण्यात आलेले हे महागडे मोबाईल सहायक पोलिस अधीक्षक ऋषिकेश शिंदे (उपविभाग, अंबाजोगाई) यांच्या हस्ते संबंधित तक्रारदारांना वितरित करण्यात आले. यावेळी आपला हरवलेला मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी पोलिस प्रशासनाचे आभार मानले. ही संपूर्ण कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलिस अधीक्षक चेतना तिडके, सहायक पोलिस अधीक्षक ऋषिकेश शिंदे आणि पोलिस निरीक्षक आर. के. नाचन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. परळी शहर पोलिसांच्या या तत्पर आणि प्रभावी कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## बीड पालिकेचा २७५ कोटींचा अर्थसंकल्प; महसुली उत्पन्नातून विकासाला गती

**बीड, २८ फेब्रुवारी** | बीड नगरपरिषदेने सन २०२६-२७या आर्थिक वर्षासाठीचा आपला वार्षिक अर्थसंकल्प (अंदाजपत्रक) जाहीर केला आहे. या आगामी वर्षात नगरपरिषदेने एकूण २७५ कोटी ४ लाख ५० हजार रुपयांच्या उत्पन्नाचे उद्दिष्ट ठेवले असून, हा अर्थसंकल्प शिलकी स्वरूपाचा आहे. ३१ मार्च २०२७ अखेर ७ लाख ५० हजार रुपयांची शिल्लक अपेक्षित धरण्यात आली आहे. बीड शहरातील विविध विकासकामे, आस्थापना खर्च, आरोग्यसेवा, दिवाबत्ती आणि पाणीपुरवठा यांसारख्या अत्यावश्यक सेवांवर नगरपरिषद २७४ कोटी ९९ लाख रुपये खर्च करणार आहे. या नियोजित खर्चानंतर नगरपरिषदेच्या तिजोरीत ७ लाख ५० हजार रुपये शिल्लक राहणार आहेत. भांडवली जमा रकमेचा मोठा हिस्सा (१५७.८२ कोटी) हा शहरातील रस्ते, नाली बांधकाम आणि मोठ्या पायाभूत प्रकल्पांसाठी वापरला जाणार आहे. महसुली उत्पन्नातून कर्मचाऱ्यांचे पगार आणि दैनंदिन स्वच्छतेची कामे पूर्ण केली जातील. नगरपरिषदेने मांडलेला हा अर्थसंकल्प शहराच्या सर्वांगीण विकासासाठी दिशादर्शक ठरणार आहे.

# पत्राच्या शेडमधून लाखोंचा प्रतिबंधित गुटखा जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई



तभा वृत्तसेवा

**बीड** | जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस प्रशासनाने कंबर कसली असून, याच मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने एका पत्राच्या शेडवर धाड टाकून प्रतिबंधित गुटख्याचा मोठा साठा हस्तगत केला आहे. जिल्हा पोलीस प्रमुखांनी अवैध व्यवसायांविरुद्ध कठोर पावले उचलण्याचे आदेश दिलेले असतानाच, गुन्हे शाखेच्या पथकाला एका गुप्त बातमीदाराकडून महत्त्वपूर्ण माहिती प्राप्त झाली होती. या माहितीनुसार, शहरातील एका विशिष्ट वस्तीमध्ये राहणाऱ्या एका इसमाने आपल्या ताब्यातील पत्राच्या शेडमध्ये विविध कंपन्यांचा आणि शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा विक्रीच्या उद्देशाने साठवून ठेवला होता.

मिळालेल्या माहितीची खातरजमा केल्यानंतर, पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सकाळी त्या ठिकाणी अचानक छापा मारला. पोलिसांचे वाहन येताना पाहून संशयित आरोपीने तिथून पळ काढला, मात्र पोलिसांनी घराच्या शेजारी असलेल्या पत्राच्या शेडची आणि घराची कसून झडती घेतली. या झडतीमध्ये पोत्यांमध्ये भरून ठेवलेला विविध कंपन्यांचा सुगंधित गुटखा आढळून आला. हा साठा मानवी आरोग्यासाठी घातक असून महाराष्ट्रात त्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. पोलिसांनी सर्व माल जप्त केला असून पसार झालेल्या संशयिताचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

या कारवाईमध्ये स्थानिक गुन्हे शाखेच्या उपनिरीक्षकांसह अनेक पोलीस अंमलदारांनी सहभाग घेतला. जप्त करण्यात आलेला माल आणि संबंधित इसमाविरुद्ध स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्यात कोणत्याही प्रकारे अवैध विक्री किंवा साठा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. या कारवाईमुळे अवैध गुटखा विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, नागरिकांनी अशा प्रकारच्या छुप्या मार्गाने चालणाऱ्या धंद्यांची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले आहे.

## शिरूर नगरपंचायतीवर महिलाराज, सभापतीपदाच्या निवडी बिनविरोध

तभा. वृत्तसेवा

**बीड** | शिरूर नगरपंचायतीमध्ये विषय सभापतीपदाच्या निवडी बिनविरोध पार पडल्याने नगर पंचायतीचा कारभार आता महिला पाहणार आहेत. सभापतीपदाच्या निवडी बिनविरोध होऊन सर्व सभापतिपदाची सूत्र ही महिलांच्या हाती आल्याने आता नगरपंचायतीवर महिलाराज आले आहे.

नगरपंचायत सभापतिपदाचा कार्यकाळ संपल्यामुळे नव्याने या निवडीसाठी नगरपंचायतीमध्ये बैठक घेण्यात आली. ही नगरपंचायत आमदार सुरेश धस यांच्याकडे असल्याने एका सभापतीपदासाठी एक उमेदवारी अर्ज दाखल झाला. वेळेचे बंधन पाळत बिनविरोध निवडी जाहीर करण्यात आल्या. या प्रक्रियेत पीठासीन अधिकारी म्हणून ज्योती चव्हाण व सहपीठासीन अधिकारी म्हणून मुख्याधिकारी गणेश दहिफळे यांनी काम पाहिले. नगराध्यक्षा प्रतिभा गाडेकर पाटील यांच्याकडे स्थायी समिती, अर्थ व नियोजन समिती उपनगराध्यक्षा श्वेता देसरडा, सार्वजनिक बांधकाम सभापती सुनीता रणखांब, पाणीपुरठा, स्वच्छता व आरोग्य सभापती गयाबाई गायकवाड, महिला व बालकल्याण समिती वैजयंता तळेकर, उपसभापती संगीता गाडेकर यांची निवड करण्यात आली.

## पुतळा स्थलांतराविरोधात आंदोलनानंतर प्रशासनाची माघार

तभा. वृत्तसेवा

**बीड, २८ फेब्रुवारी** | गेवराई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याच्या प्रस्तावित स्थलांतराविरोधात शिवभक्तांनी पुकारलेले धरणे आंदोलन अखेर यशस्वी झाले.

या आंदोलनानंतर नगर परिषद प्रशासन आणि शिवप्रेमी यांच्यात झालेल्या सविस्तर चर्चेअंती पुतळा सध्याच्या ठिकाणीच ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. प्रशासनाने पुढील सर्व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्याने शिवप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. शिवप्रेमींनी उत्स्फूर्तपणे छत्रपती शिवाजी महाराज चौकात भव्य अश्वारूढ पुतळा बसवून त्याचे अनावरण केले होते.

## डोळ्यात चटणी टाकून लुटणारी टोळी जेरबंद; पोलिसांची मोठी कारवाई

तभा. वृत्तसेवा

**बीड** | रस्त्याने जाणाऱ्या प्रवाशांना अडवून त्यांच्या डोळ्यात तिखट चटणी टाकून लुटणाऱ्या एका सराईत दरोडेखोरांच्या टोळीला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश आले आहे. काही दिवसांपूर्वी एका व्यापाऱ्याला रस्त्यात अडवून, त्याला चाकूसारख्या धारदार शस्त्राचा धाक दाखवून आणि डोळ्यात चटणी फेकून त्याच्याकडील सोन्याचे दागिने आणि दुचाकी लुटल्याची खळबळजनक घटना घडली होती. या गंभीर गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी परिसरातील अनेक ठिकाणचे चित्रीकरण तपासले आणि तांत्रिक माहितीच्या आधारे संशयितांचा माग काढला.

तपासादरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, पोलिसांनी सापळा रचून या टोळीतील मुख्य सूत्रधारासह त्याच्या इतर साथीदारांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे केलेल्या अधिक चौकशीत त्यांनी या गुन्ह्याची कबुली दिली असून, पोलिसांनी त्यांच्याकडून लुटलेले सोन्याचे दागिने, गुन्ह्यात वापरलेल्या दुचाकी आणि भ्रमणध्वनी असा लाखो रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

या टोळीने अशाच प्रकारे आणखी काही ठिकाणी गुन्हे केले आहेत का, याचा तपास आता पोलीस करत आहेत. या धाडसी कारवाईमुळे परिसरात भीतीचे वातावरण कमी होण्यास मदत झाली असून, पोलीस दलाच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## पीसीपीएनडीटी कायद्याबाबत जनजागृतीसाठी परळी वैजनाथ उपजिल्हा रुग्णालयाचा पुढाकार



तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** | उपजिल्हा रुग्णालय परळी वैजनाथ येथे आज पीसीपीएनडीटी कायद्याविषयी जनजागृती व मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात पार पडली. सदर कार्यशाळेचे आयोजन रुग्णालय प्रशासनामार्फत करण्यात आले होते.

कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. तांदळे सर (निवासी वैद्यकीय अधिकारी, बाह्य) तसेच ॲड. निलेश जोशी सर (न्याय व विधी सल्लागार, जिल्हा रुग्णालय बीड) यांनी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी पीसीपीएनडीटी कायद्याच्या तरतुदी, अंमलबजावणीतील महत्त्वाचे मुद्दे, नोंदवही व कागदपत्रे व्यवस्थित ठेवण्याचे नियम तसेच कायदेशीर बाबी याविषयी माहिती दिली. तसेच लिंगनिदान प्रतिबंधाबाबत जागरूकता निर्माण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरुण गुट्टे सर, परळीतील सुप्रसिद्ध डॉ. श्याम काळे, डॉ. रंजना घुगे, तसेच उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. दिनेश कुरमे, डॉ. वैशाली गंजेवार, डॉ. व्यंकटेश तिडके, डॉ. कल्पना घुगे, डॉ. शुभांगी मुंडे, डॉ. ज्ञानेश्वरी मुंडे, डॉ. किशोर घुबडे, डॉ. बालाजी फड, डॉ. प्रियंका डोळे, डॉ. श्रीकांत वल्लमवाड उपस्थित होते. कार्यालयीन अधीक्षक श्री. पुरुषोत्तम जुजगर, वरिष्ठ लिपिक श्री. प्रशांत कराड, कनिष्ठ लिपिक श्री. माणिक मुंडे, सहाय्यक अधिसेविका श्रीमती यमुना गायकवाड, परिसेविका श्रीमती टाकळकर, दहिफळे, भावले तसेच रुग्णालयातील आधीपरिचारिका, तंत्रज्ञ व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिंपळनेरमध्ये कांद्याच्या पिकात अफूची बेकायदेशीर शेती करणाऱ्यावर छापा

### १०.५८ लाखांचा मुद्देमाल जप्त



तभा. वृत्तसेवा

**बीड** | पोलीस स्टेशन पिंपळनेरच्या पथकाने मौजे पिंपळनेर शिवारात एका शेतावर छापा टाकून, कांद्याच्या पिकात लपवून केलेली अफूची बेकायदेशीर लागवड उघडकीस आणली आहे. या कारवाईत सुमारे ४२ किलोपेक्षा जास्त वजनाची अफूची झाडे जप्त करण्यात आली असून आरोपीविरुद्ध एन.डी.पी.एस. (NDPS) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेचा तपशील:

दिनांक २७.०२.२०२६ रोजी पिंपळनेर पोलिसांना खात्रीशीर बातमी मिळाली होती की, विशाल भगवान इतापे (वय २९, रा. पिंपळनेर) हा आपल्या शेतात अफूच्या झाडांची बेकायदेशीर लागवड व जोपासना करत आहे. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या परवानगीने आणि महसूल विभागाच्या राजपत्रित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दुपारी १५.०० वाजता सदर शेतावर छापा टाकण्यात आला.

जप्त केलेला मुद्देमाल:

* अफूची झाडे: शेतातील कांदा व लसूण पिकाच्या मध्यभागी लावलेली अफूची हिरवीगार झाडे पोलिसांनी उपटून जप्त केली.
* एकूण वजन: जप्त केलेल्या अफूच्या झाडांचे एकूण वजन ४२ किलो ३५५ ग्रॅम भरले.
* बाजार मूल्य: जप्त करण्यात आलेल्या या मालाची अंदाजे किंमत १०,५८,८७५/- रुपये इतकी आहे.

आरोपी विशाल भगवान इतापे याच्या विरुद्ध अमली पदार्थ विरोधी कायदा (NDPS Act, १९८५) च्या कलम ८(क) आणि १५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सदर कारवाई मा नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक, पूजा पवार पोलीस उप अधीक्षक यांच्या मार्गदर्शनात सपोनि श्री. घुगे, पोउपनि गोलवाल, शिंदे, ग्रेड पोउपनि आत्माराम गर्जे आणि पोलीस कर्मचारी वनवे, घुमरे, पठाण, ढाकणे, तावरे व चालक पवार यांच्या पथकाने केली. या मोहिमेत महसूल विभागाचे प्रतिनिधी म्हणून श्री. प्रशांत ढोले (ग्राम महसूल अधिकारी) आणि कृषी सहाय्यक शिंदे उपस्थित होते.

## जेईई,नीट,सीईटी परीक्षेसाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

तभा. वृत्तसेवा

**बीड, २८ फेब्रुवारी** | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत येत असलेल्या छत्रपती संभाजीनगर/ जालना, लातूर /बीड अंतर्ग येत असलेल्या सर्व शासकीय / अनुदानित आश्रमशाळांमध्ये इयत्ता १० वी ते १२ वी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना जेईई, नीट, सीईटी या परीक्षांची पूर्वतयारी करण्यासाठी नामवंत प्रशिक्षण संस्थांमध्ये मार्गदर्शन दिले जाणार आहे. त्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी अर्ज भरुन द्यावे असे आवाहन प्रकल्प अधिकारी चेतना मोरे यांनी केले आहे.

सर्व शासकीय, अनुदानित आश्रमशाळा तसेच EMRS / मराठी माध्य शाळा / जिल्हा परिषद/ नगरपालिका व महानगर पालिकांमधील माध्यमिक शाळां मध्ये इयत्ता १० वी नंतर ११ वी व १२ वी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना २ वर्ष कालावधी मध्ये नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थेच्या साहाय्याने अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परिक्षेची पूर्व तयारी करून घेणेकरिता प्रशिक्षण कार्यक्रम राबविल्यास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय किंवा आय. टी. आय. मधील अभ्यासक्रमा च्या प्रवेशा करीता (JEE/NEET/CET) जास्तीत जास्त अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी परिक्षेसाठी पात्र राहतील. त्यासाठी छत्रपती संभाजीनगर /जालना /लातूर/ बीड अंतर्गत येत असलेल्या शासकीय अनुदानित आश्रमशाळा/ EMRS / मराठी माध्य शाळा / जिल्हा परिषद शाळांच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर येथे सादर करावे. विहीत नमुन्यातील आवेदनपत्र शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचे कडे विनामुल्य उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांची आवेदनपत्र लवकरात लवकर प्रकल्प कार्यालयाकडे / मुख्याध्यापकांमार्फत सादर करावे असे आवाहन अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना करण्यात आले आहे.

## महाराष्ट्रातील 2 हजार स्वच्छता दूत होणार सहभागी

तभा. वृत्तसेवा

**केज** | महाराष्ट्रातील प्रसिद्ध डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान च्या वतीने केज शहरात प्रथमच रविवार दि १ मार्च रोजी सकाळी ७ ते १० या वेळेत ऐतिहासिक महास्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून यावेळी शहरातील सर्व प्रमुख रस्ते, भाग आणि शासकीय कार्यालये यांचा परिसर स्वच्छ करण्यात येणार असल्याचे प्रतिष्ठान च्या वतीने कळविण्यात आले आहे. रविवारी सकाळी ठीक सात वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून एका छोट्या कार्यक्रमाने या मोहिमेस सुरुवात होणार आहे.

केज मध्ये रविवारी पार पडणाऱ्या या स्वच्छता मोहिमेत राज्याच्या वेगवेगळ्या ठिकाणचे दोन हजाराहून अधिक सदस्य सहभागी होणार आहेत. यासाठी लागणारी भोजन व्यवस्था, हातमौजे, झाडू व मास्क इत्यादी स्वच्छता साहित्य प्रतिष्ठान च्या वतीने पुरविण्यात येणार असून केवळ जमा केला जाणारा कचरा उचलण्यासाठी वाहनाची मदत केज नगरपंच्यायत कडून घेतली जाणार आहे. या उपक्रमांतर्गत केज शहारातील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते - डॉ थोरात यांचे हॉस्पिटल, शिक्षक कॉलनी, विठाईपुरम,कामगार नगर, उमरी रोड, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, बालाजी मंदिर, भवानी चौक, मंगळवार पेठ कॉर्नर, कानडी रोड इत्यादी भागात स्वछता केली जाणार आहे. डॉ श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान हे एक अध्यात्मिक प्रतिष्ठान असून या प्रतिष्ठान द्वारे स्वच्छता मोहिमेसह, वृक्षारोपण व संगोपन, महाआरोग्य शिबीरे, दिव्यांगासाठी आवश्यक साहित्य वाटप, कर्ण बधिरासाठी श्रवणयंत्रे वाटप, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, व दुष्काळजन्य परिस्थितीवर मात करण्यासाठी जलस्रोत निर्माण करणे इत्यादी सामाजिक उपक्रम राबविले जातात.

## गोदावरी पात्रात केनीसह ट्रॅक्टरवर पोलिसांची कारवाई

**बीड** | तपोनिमगाव येथील गोदावरी पात्रातून केनीच्या सहाय्याने वाळू उपसा सुरू असल्याची माहिती पोलीसांना मिळाल्यानंतर पोलीसांनी सापळा लावला. गोदावरी पात्रात केनीसह ट्रॅक्टर पकडण्यात आले असून तलवाडा पोलीसांनी मुद्देमाल जप्त करण्याची कारवाई केली.

वाळू चोरी प्रकरणी तलवाडा पोलीस स्टेशन येथे कलम ३०३, (२) ६२, प्रमाणे चालक मालक गोविंद गोबरे, वय ३५ रा. टाकरवण यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या विज्ञानाच्या जाणिवा व्यापक करणे व संशोधन वृत्तीला चालना देण्यासाठी विज्ञान दिनाचे आयोजन

तभा. वृत्तसेवा

**अंबड (प्रतिनिधी)** | कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या विज्ञानाच्या जाणिवा व्यापक करण्यासाठी तसेच संशोधन वृत्तीला चालना देण्यासाठी सकाळच्या प्रार्थना सभेत विज्ञान दिन उत्साहात संपन्न झाले . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मा.श्री.प्रदीपजी जोशी सर माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री सुधाकर



घेऊन कार्य करावे .राष्ट्रीय विज्ञान दिन आपल्याला विज्ञानाच्या महत्त्वाची जाणीव करून देतो. विज्ञानामुळेच आज मानवाचे जीवन अधिक सोयीस्कर व प्रगत झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून संशोधनाची आवड जोपासली पाहिजे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. योगेश दातीर सर यांनी केले आभार श्री अनिल चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# विविध कर्ज योजनेची प्रकरणे बँकांनी तत्काळ पूर्ण करावीत- गुप्ता

## जिल्ह्याच्या पोटेन्शियल लिंक्ड प्लॅनचे राहुल गुप्ता यांचेहस्ते प्रकाशन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ फेब्रुवारी**

जिल्ह्यातील सर्व बँकांच्या विविध शासकीय कर्ज योजनांअंतर्गत कामगिरीचा सविस्तर आढावा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी घेतला. यावेळी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उन्नती योजना तसेच दुग्ध व्यवसाय कर्ज योजनेअंतर्गत प्रकरणांची स्थिती, मंजुरी व वितरित कर्ज यांचा आढावा घेऊन विविध कर्ज योजनांची प्रकरणे तात्काळ निकाली काढून उद्दिष्टे लवकर पूर्ण करावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आढावा बैठकीत दिले.

हिंगोली जिल्ह्याची बँकर्स जिल्हास्तरीय सल्लागार समिती व जिल्हास्तरीय पुनरावलोकन समितीची बैठक नुकतीच जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस अग्रणी जिल्हा व्यवस्थापक सुजित झोडगे, जिल्हा विकास व्यवस्थापक अविनाश लहाने, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अनिल कदम, आरसेटी संचालक हेनराज बन्सोड, एमएसआरएलएमचे प्रतिनिधी, मत्स्यव्यवसाय व पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी तसेच विविध बँकांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये योजनांच्या अंमलबजावणीत गती आणण्याबाबत तसेच प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी संबंधित बँकांना दिल्या. तसेच ठरविण्यात आलेली उद्दिष्टे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असेही त्यांनी यावेळी निर्देशित केले.

या बैठकीदरम्यान हिंगोली जिल्ह्याचा पोटेन्शियल लिंक्ड प्लॅन २०२६-२७ अधिकृतरित्या जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. जिल्ह्याच्या आर्थिक विकासासाठी दिशादर्शक ठरणाऱ्या या दस्तावेजाचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले.

प्रकाशित करण्यात आलेला पोटेन्शियल लिंक्ड प्लॅन २०२६-२७ हा जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील पतक्षमतेचा सखोल आढावा घेणारा असून, जिल्ह्याच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी बँकांना मार्गदर्शन करणारा महत्त्वपूर्ण दस्तावेज असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# युवक-युवतींना देशाच्या स्वातंत्र्याची जाणीव असली पाहीजे

## आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ फेब्रुवारी**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधान, नेतृत्व गुण, व्यक्तिमत्व विकास, देशाच्या स्वातंत्र्याची जाणीव, स्वातंत्र्य सैनिकांचे बलिदान याविषयी सजग भान ठेवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी केल.

येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दि २८ फेब्रुवारी रोजी विकसित भारत युथ पार्लमेंट अंतर्गत आणीबाणीची ५० वर्षः भारतीय लोकशाहीसाठी धडे या विषयावरील जिल्हास्तरीय विकसित भारत युवा संसद स्पर्धा-२०२६ चे आयोजन आदर्श महाविद्यालय हिंगोली व मेरा युवा भारत केंद्र हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

भारत सरकारच्या युवा व खेळ मंत्रालया द्वारे भारतीय लोकशाही प्रगल्भ होण्याच्या दृष्टीने भारतातील १८ ते २५ वयोगटातील युवकांचे विचार जानुन घेणे, युवकांना सामाजिक प्रश्न समजुन घेण्यासाठी प्रेरीत करणे, युवकांमध्ये निर्णय क्षमता विकसीत करणे, इतरांच्या विचारांचा व भावणांचा आदर करणे व युवकांमध्ये नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी जिल्हास्तरीय भारतीय युवा संसद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन आ.तान्हाजीराव मुटकुळे यांच्या शुभहस्ते पार पडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कमलकिशोर काबरा उपस्थित होते तर प्रमूख पाहुणे म्हणून आदर्श शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. गणेश चौधरी, कार्यकारिणी सदस्य चंद्रकांतराव निलावार, रमेशचंद्र मुंदडा उपस्थित होते. तसेच किशोर सोनी, अमृत वर्मा, प्रशांत सोनी, सुमित चांडक, ॲड. के. के. शिंदे, सचिन शिंदे यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक पर मनोगतात प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांनी आपल्या देशाचे भविष्य युवकांच्या हातामध्ये आहे, आजच्या युवकांमध्ये काही ना काही करण्याची धमक आहे असे सांगून संविधानातील राष्ट्रीय आणीबाणी बाबतच्या तरतूदी विषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात कमलकिशोरजी काबरा यांनी मार्गदर्शन करतांना युवा संसद कार्यक्रमामधून भारतीय संविधानाची महती घराघरात पोहचेल अशी अशा व्यक्त करून स्पर्धक विद्यार्थ्यांना यश संपादनासाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी उपप्राचार्य प्रो. डॉ. संजीवकुमार नरवाडे, उपप्राचार्य प्रा. डॉ. सुरेंद्र साहू, पर्यवेक्षक प्रा. धनंजय जोशी, प्रबंधक दिलीप दुबे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सचिन हटकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. तुकाराम हापगुंडे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी जिल्हाभरातील विविध महाविद्यालयामधून आलेल्या एकूण १४ स्पर्धक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला होता. स्पर्धेसाठी पाच स्पर्धक विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये प्रथम क्रमांक डोंबे ओंमकार त्र्यंबक, द्वितीय क्रमांक आयुष गौरव गुप्ता, तृतीय क्रमांक गोदावरी बाबुराव रोडगे, चतुर्थ क्रमांक सायली बाबाराव कदम, पाचवा क्रमांक ज्ञानेश्वर मोतीराम मुडे यांची निवड करण्यात आली. सदरील स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. डॉ. आशा गिरी, प्रा. डॉ. वृषाली फुके, प्रा. डॉ. गजानन घोडे, प्रा. डॉ. सुभाष चव्हाण, प्रा. डॉ. संदीप चौधरी यांनी काम पाहिले.

सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाचे आयोजक प्रा. डॉ. सचिन हटकर, प्रा. डॉ. तुकाराम हापगुंडे, जिल्हा युवा अधिकारी शिवधन शर्मा तसेच डॉ. जि. पी. चव्हाण, डॉ. पी. एन. शिंदे, डॉ. एम. आर. कोल्हे आदींनी परिश्रम घेतले.

# मराठी भाषा दिनानिमित्त विविध कार्यक्रम, कवी संमेलन रंगले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ फेब्रुवारी**



मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधत मराठवाडा साहित्य परिषद शाखा हिंगोली व थवा प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य साहित्य संमेलन उत्साहात पार पडले. अभिजात मराठीच्या जतन-संवर्धनाचा संकल्प आणि नव्या पिढीपर्यंत भाषेची गोडी पोहोचविण्याचा ध्यास या कार्यक्रमातून प्रकर्षाने जाणवला.

पहिल्या सत्राचे अध्यक्ष अशोक अर्धापुरकर यांनी 'अभिजात मराठी भाषेसमोरील आव्हाने' या विषयावर अभ्यासपूर्ण विचार मांडले. जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा वेग आणि बदलती वाचनसंस्कृती यामध्ये मराठीची आेळख टिकविण्याची जबाबदारी सर्वांची असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रमुख पाहुणे राजाराम बनसकर व कलानंद जाधव यांनी 'माय मराठी आणि कवितेची स्थित्यंतरे' यावर भाष्य करत पारंपरिकतेपासून आधुनिकतेपर्यंत कवितेने घेतलेली झेप अधोरेखित केली.

सभागृहात पारिजात देशमुख यांच्या ओळींनी वातावरण भारावले.

दुसऱ्या सत्रात रतन आडे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन रंगले. प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. सुमन दुबे व दिलीप धामणे उपस्थित होते. जवळपास ४० हून अधिक कवींनी विविध विषयांवरील रचना सादर करत सभागृहात भावविश्वाची उधळण केली.कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन डॉ. राधिका देशमुख व डॉ. गायत्री दरगू यांनी केले. आभार प्रदर्शन अश्विनी देशमुख यांनी मान्यवर व उपस्थितांचे आभार मानत केले. कार्यक्रमाच्या यशासाठी प्रकाशराव कावरखे, आशुतोष देशमुख, गजानन शिंदे, संतोष ससे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त

### हिंगोलीत आज भव्य हिंदू संमेलन



हिंगोली-संघटित हिंदू धर्म, शक्तिशाली भारत या संकल्पनेसह, देशातून जातीवादाला निरोप देत, आपण सर्व हिंदू भाऊ आहोत अशी घोषणा देत, १ मार्च रोजी हिंगोली शहरात एक विशाल हिंदू अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. हिंदू धर्मातील सर्व समुदायांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने, हे भव्य हिंदू अधिवेशन रविवारी दुपारी ४.३० ते ७.३० या वेळेत शहरातील रामलीला मैदानावर होणार आहे. या कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य इंद्रेशकुमारजी प्रमुख वक्ते आणि मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. या भव्य हिंदू परिषदेचे आयोजन हिंदू परिषदेच्या समिती, हिंगोली शहरातर्फे केले जात आहे. या कार्यक्रमाला सर्व हिंदूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### पवार पब्लीक स्कूलचे ऑलिंपियाडमध्ये यश



हिंगोली-शहरातील अंबिका नगर येथील पवार पब्लिक स्कूल मधील विद्यार्थ्यांनी नॅशनल सायन्स ओलंपियाड परीक्षेमध्ये यश संपादन केले. इयत्ता पहिली ते सातवी मधील विद्यार्थ्यांनी या परीक्षेमध्ये सहभाग नोंदविला होता त्यामधून पंधरा विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल संपादन केले. यावेळी शाळेचे संचालक प्रणव पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल व सर्टिफिकेट देऊन गौरवण्यात आले. यावेळी कोमल अग्रवाल, सचिन धामणे, सॉली केसी, जॉबीन जॉर्ज, योगेश थोरात, अपर्णा जामकर, दीपाली राऊत, अश्विनी बोराळकर, पंकज इंगोले, फिजा सय्यद, दिपाली मुदिराज, रुपाली ठाकरे, छाया धनवे, सचिन इंगोले, गजानन वानरे, कपिल मस्के, संतोष पाईकराव, वैभव काळे, विकास महानोर आदींची उपस्थिती होती.

### ९ वाहन चालकांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९ वाहन चालकांवर पोलिसांनी कारवाई करीत वाहन चालकांकडून १८ हजारांचा दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच २ ठिकाणी अवैधदारू विक्रीवर छापे मारण्यात आले आहेत.

# नोटीस देऊनही बेकायदेशीर बांधकाम सुरूच मुख्याधिकारी, नगर रचना अभियंताचे मौन

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २८ फेब्रुवारी**



वसमत नगरपरिषदेने वसमत बसस्थानक परिसरातील बेकायदेशीर बांधकाम थांबवण्यासाठी नोटीस बजावली खरी परंतु नोटीस देऊनही काम बंद न पडता उलट पुन्हा जोरात बांधकाम सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे शहरात संतापाची लाट पसरली असून नोटीसचा धाकच राहिला नाही काय? असा सवाल नागरिक करत आहेत.

वसमत बसस्थानक परिसरात विना-परवानगी बांधकाम सुरू असल्याने प्रशासनाने तात्काळ काम बंद करण्याचे आदेश दिले होते.तरीसुद्धा कंत्राटदाराने खुलेआम काम सुरू ठेवल्याने प्रशासनाची कोंडी झाल्याचे चित्र आहे.

सार्वजनिक प्रकल्पाच्या नावाखाली हे काम कुणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, अशी चर्चा शहरात रंगली असून राजकीय दबावाचीही कुजबुज ऐकू येत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात सुरू असलेले हे बांधकाम कायद्याच्या कचाट्यात अडकण्याची शक्यता व्यक्त होत आहे. नगरपरिषद प्रशासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ व ५३ नुसार कारवाईचा इशारा दिला असतानाही काम थांबत नसल्याने मुख्याधिकारी आणि नगर रचना अभियंता गप्प का? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

दरम्यान, शहरातील काही नागरिकांनी लेखी हरकत नोंदवत बांधकामाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली असून बांधकामाची सर्व कागदपत्रे तपासूनच पुढील परवानगी द्यावी, अन्यथा कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# विज्ञानवारीसाठी निघालेल्या विद्यार्थ्यांच्या बसला दाखवली हिरवी झेंडी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ फेब्रुवारी**



राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील ४६ विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र संशोधन संस्था आयुका, पुणे येथे शैक्षणिक अभ्यास सहलीसाठी जाणाऱ्या 'विज्ञानवारी' बसला जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले.

यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प अधिकारी नामदेव केंद्रे, गटशिक्षणाधिकारी दत्ता नांदे, केंद्रप्रमुख, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण होऊन भविष्यात संशोधन क्षेत्राकडे वळण्यासाठी या विज्ञानवारीचा उपयोग होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. ही सहल २७ व २८ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आली असून, हिंगोली जिल्ह्यात उभारण्यात येत असलेल्या जागतिक दर्जाच्या इंडिया प्रयोगशाळेची मातृसंस्था असलेल्या आयुका येथे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वैज्ञानिक कार्यपद्धतीची ओळख होणार आहे. हा उपक्रम हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील यांच्या पुढाकारातून राबविण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, संशोधन वृत्ती वाढीस लागावी आणि शास्त्रज्ञांच्या कार्याची जवळून ओळख व्हावी, या उद्देशाने या शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे विज्ञानाधिष्ठित समाज निर्मितीस निश्चितच चालना मिळणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

# ग्रंथ वाचनातून समाजाची खरी प्रगती- ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत देशमुख



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ फेब्रुवारी**

समाजातील वाढत्या समस्या, असमानता आणि विचारांतील गोंधळ यावर प्रभावी उपाय म्हणजे ग्रंथ वाचन व विचारांची चिकित्सा होय. प्रत्येकाने दरवर्षी किमान काही रकमेची पुस्तके खरेदी करून वाचनाची सवय लावली पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत देशमुख यांनी केले.

येथील कै. रं.रा. बियाणी नूतन साहित्य मंदिर वाचनालयात आयोजित हिंगोली ग्रंथोत्सव-२०२५ चे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रा. विलास वैद्य, प्रा. खंडेराव सरनाईक, अशोक अर्धापूरकर, सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, विभागीय ग्रंथालयाचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव, जिल्हा ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक, सहायक माहिती अधिकारी चंद्रकांत कारभारी आदी उपस्थित होते.

यावेळी श्रीकांत देशमुख यांनी सांगितले की, लोकसंख्या वाढत असताना माणुसकी कमी होत चालली आहे, ही चिंतेची बाब आहे. इतिहासातील महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत तुकाराम आणि छत्रपती शिवाजी महाराज यांसारख्या महान व्यक्तींच्या विचारांचा अंगीकार केल्यास समाज अधिक सक्षम होऊ शकतो. वाचनामुळे विवेक, प्रश्न विचारण्याची क्षमता आणि सामाजिक जाण विकसित होते, असे त्यांनी नमूद केले. प्रत्येक घरात लहानसे ग्रंथालय असावे, असे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात राहुल गुप्ता यांनी विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकांसोबत विविध साहित्याचे वाचन करावे, असे आवाहन केले. दर महिन्याला किमान एक पुस्तक वाचण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी करावा, असे ते म्हणाले. वाचनामुळे विचारांमध्ये व्यापकता येते आणि योग्य निर्णयक्षमता विकसित होते. स्पर्धा परीक्षांसाठीही वाचन अत्यंत उपयुक्त ठरते, असे त्यांनी स्पष्ट केले.



ग्रंथोत्सव हा केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून हिंगोलीची वैचारिक परंपरा जपणारी चळवळ असल्याचे प्रा. विलास वैद्य यांनी सांगितले. साहित्य वाचनामुळे संवेदनशीलता व विचारांची परिपक्वता वाढते, त्यामुळे प्रत्येकाने वाचनाकडे वळावे, असे त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविकात जिल्हा ग्रंथालय अधिकारी आशिष ढोक यांनी ग्रंथोत्सवाच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. यामध्ये परिसंवाद, व्याख्याने, कवी संमेलन आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी या ज्ञानोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यंदा साहित्यिकांचा सत्कार, क्युआर कोडद्वारे सभासद नोंदणी आणि अभिप्राय संकलन उपक्रम राबविण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. नामदेव दळवी व गजानन शिंदे यांनी केले, तर सर्व उपस्थितांचे प्रा. विलास खरात यांनी मानले.

या कार्यक्रमास जिल्ह्यातील सार्वजनिक वाचनालयाचे प्रतिनिधी, ग्रंथपाल, पत्रकार, शिक्षक, विद्यार्थी, महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# योजनांच्या महामेळाव्यातून कायद्याची माहिती लोकांपर्यंत पोहोचवा : न्यायमूर्ती निरज धोटे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ फेब्रूवारी-**

संविधानानुसार समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळणे हा त्यांचा हक्क आहे. वंचित घटक मोफत न्याय व शासकीय योजनांपासून वंचित राहू नयेत, यासाठी विधी सेवा प्राधिकरणामार्फत सातत्याने शिबिरे आयोजित केली जातात. या महाशिबिराच्या माध्यमातून अधिकाधिक नागरिकांपर्यंत कायद्याची माहिती व विविध शासकीय योजना पोहोचवाव्यात, असे आवाहन मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती निरज पी. धोटे यांनी केले.

विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा प्रशासन, तालुका विधी सेवा समिती भोकर व अभिवक्ता संघ भोकर यांच्या संयुक्त विद्यमाने भोकर येथील हनुमान नगर, किनवट रोडवरील खुले मैदान येथे विधी सेवा महाशिबिर व शासकीय सेवांचा महामेळावा आयोजित करण्यात आला होता.



न्यायमूर्ती नीरज धोटे यांच्या हस्ते वृक्षांना पाणी घालून कार्यक्रमाचे उद्धाटन करण्यात आले.

यावेळी प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र ब्रम्हे, तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष मोहम्मद नासिर मोहम्मद सलीम, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद देशपांडे, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय अधिकारी प्रवीण मेगशेट्टी, अभिवक्ता संघ भोकरचे अध्यक्ष पी. आर. त्रेपतवार यांच्यासह न्यायाधीश, विविध विभागांचे अधिकारी, विधीज्ञ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी बंजारा नृत्याचे सादरीकरण केले.

न्यायमूर्ती नीरज धोटे म्हणाले, शासन विविध कल्याणकारी योजना राबवित असले तरी अनेकांना त्यांची माहिती नसते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या मेळाव्यातील सर्व स्टॉलना भेट देऊन योजनांची माहिती घ्यावी व त्यांचा लाभ घ्यावा. येत्या १४ मार्च रोजी आयोजित लोकअदालतीत प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी पक्षकार व विधीज्ञांनी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

**समान न्याय व आर्थिक समानता हा प्रत्येकाचा हक्क : प्रमुख जिल्हा न्यायाधीश नरेंद्र ब्रम्हे**

प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र ब्रम्हे यांनी संविधानातील कलम ३९ (अ) नुसार समान न्याय व आर्थिक समानता हा प्रत्येकाचा हक्क असल्याचे सांगितले. न्याय मागण्याची संधी प्रत्येकाला समान आहे. विधी सेवा प्राधिकरणाच्या विविध समित्यांमार्फत कायदेविषयक जनजागृती केली जाते. या महाशिबिराचा उद्देश वंचित घटकांना कायद्याची माहिती व शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हा आहे. आपण या माध्यमातून कायदेशीर साक्षरते कडून कायदेशीर सक्षमते कडे वाटचाल करीत आहोत असे त्यांनी सांगितले.

यावेळी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष मोहम्मद नासिर, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व अभिवक्ता संघ भोकरचे अध्यक्ष पी. आर. त्रेपतवार यांनीही मनोगत व्यक्त केले.

**मान्यवरांच्या हस्ते लाभांचे वितरण**

महामेळाव्यात विविध योजनांच्या लाभार्थ्यांना मदत व आदेशपत्रांचे वितरण करण्यात आले. तहसील कार्यालयामार्फत शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील वारसांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले. तसेच संजय गांधी निराधार योजना, प्रधानमंत्री आवास योजना, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत बेबी केअर किट, कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ट्रॅक्टर वितरण, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत प्रत्येकी दोन लाख रुपयांचे अनुदान आदींचे वितरण करण्यात आले. आरोग्य, शिक्षण व विद्युत विभागाकडूनही विविध प्रमाणपत्रे व लाभ देण्यात आले.

महामेळाव्यात विविध विभागांचे एकूण ५० स्टॉल उभारण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तदर्थ जिल्हा न्यायाधीश बी. यू. चौधरी व वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश ए. पी. कराड यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिव शरद देशपांडे यांनी केले. कार्यक्रमानंतर मान्यवरांनी सर्व स्टॉलना भेट देऊन पाहणी केली.

## मुदखेड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विज्ञान दिवस साजरा

**मुदखेड** -मुदखेड येथील बंदा बैरागी (बंदा सिंघजी बहादूर ) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत दि.२७ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. सर्वप्रथम चन्द्रशेखर वेंकट रमन यांच्या प्रतिमेस



पुष्पहार व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी बंदा बैरागी (बंदा सिंघजी बहादूर ) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य तथा प्रभारी एस.एस. परघणे, व श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज शारदा नगर सगरोळी जिल्हा नांदेड येथील प्राचार्य संभाजी गायकवाड यांची प्रमुख वक्ता म्हणून उपस्थिती होती. राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या कार्यक्रमा निमित्त प्रमुख वक्ते यांचा श्रीफळ शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. श्याम मोहरे - निर्देशक इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी साहेबराव भिसे -विभागप्रमुख उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण विभाग हे सुद्धा कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली होती. प्रमुख्य वक्ता संभाजी गायकवाड यांनी विज्ञान अंधश्रद्धा व स्त्री सशक्तिकरण तसेच देशाचा गौरवशाली इतिहास यावर प्रकाश टाकला व संस्थेचे प्राचार्य एस. एस. परघणे यांनीसर चन्द्रशेखर वेंकट रमन यांच्या बद्दल उपस्थित विद्यार्थी व प्रशिक्षाणार्थी यांना सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमा प्रसंगी प्रशिक्षाणार्थी प्रतिनिधी कु.मेघा निखाते यांच्यासह विद्यार्थी, प्रशिक्षाणार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया होले शिल्प निदेशक यांनी केले. आभार प्रदर्शन गटनिदेशक सुनिल नन्नावरे, आयशा बेगम सय्यद शिल्प निदेशक यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिल्प निदेशक अनिल बोइनर, स्वाती कदम, विना आंबेकर, सरपाते राजरत्न, प्रतिक हनुमंते,पंकज पवार,आरती गायकवाड, हेड क्लर्क पी.एल. वाघमारे,वरिष्ठ लिपीक निलेश लोट, भांडारपाल खराटे डी.एन. तसेच हर्षवर्धन चौदंते, निलाबाईं आदींनी विशेष परीश्रम घेतले.

## मुदतवाढीच्या ऐतिहासिक निर्णयाचे सरपंच परिषदेकडुन स्वागत


**नांदेड** -राज्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याऐवजी विद्यमान सरपंचांनाच मुदतवाढ देण्याचा राज्य सरकारचा ऐतिहासिक निर्णय जाहीर होताच सरपंच परिषदेने त्याचे जोरदार स्वागत



केले आहे. या निर्णयामुळे ग्रामीण प्रशासनात सातत्य राहणार असून विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या पार्श्वभूमीवर सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, नांदेड जिल्हाध्यक्ष नारायण कदम आणि नांदेड जिल्हा समन्वयक संदीपभाऊ मोरे यांच्यासह राज्यातील सरपंच परिषदेचे शिष्टमंडळ उपस्थित होते. त्यांनी या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री आणि ग्रामविकास मंत्र्यांचे विशेष आभार मानले. यावेळी बोलताना नांदेड जिल्हा समन्वयक संदीपभाऊ मोरे म्हणाले, प्रशासकीय राजवटीपेक्षा लोकनियुक्त प्रतिनिधींच्या हातात सत्ता असणे हे ग्रामीण विकासासाठी अधिक पोषक आहे. आमदार श्रीकांत भारतीय साहेब यांच्या मध्यस्थीमुळे आणि सरपंच परिषदेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा लोकहिताचा निर्णय शक्य झाला. या निर्णयामुळे ग्रामीण जनतेची मोठी गैरसोय टळणार असून विकासकामांना खंड पडणार नाही. ग्रामीण भागातील प्रलंबित कामांना गती देत गावगाड्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी सरपंच परिषद कटिबद्ध राहील, असा विश्वासही मोरे यांनी व्यक्त केला. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे ग्रामीण स्वराज्य व्यवस्थेला बळकटी मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## आदमपूर परिसरात खोबर,साखर गाठ्यांनी सजली दुकाने

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूरसह थडीसावळी, मुतन्याळ, आळंदी, केरूर, अटकळी, टाकळी, मिनकी,बडूर, बामणी, अजणी, खतगांव, केसराळी,थडी हिप्परगा,शिंपाळा,सगरोळी, दौतापूर,



बोळेगांव,गळेगांव आदि गाव परिसरातील होळी,धुळवड अर्थात शिमग्याच्या पर्वानिमित्त विशेष खोबरगाठी,साखरगाठ्यांनी दुकाने सजल्याचे चित्र पहावयास मिळते.फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी होळीचा उत्सव सबंध महाराष्ट्रभरात साजरा केला जातो. होळीच्या सणाला गाठींचे महत्व आहे.परंपरागत बाईलेकीच्या घरीदारी भाऊरायाच्या हस्ते गाठी पोहोच केल्या जातात.सणानिमित्त ही आपुलकीची व नातेबंधाची वहिवाट आजही सुरूच आहे!बच्चे मंडळींकडून तर गळ्यात गाठींचे हार घालून खेळताखेळता त्या गाठींचा फडशा पाडला जातो.ग्रामीण परिसरातील व्यापाऱ्यांनी गाठ्यांची दुकाने थाटली आहेत.एक किलो खोबरगाठीस सव्वाशे रुपये तर साखरगाठीस पंधराने एक नग असल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगितले गेले. होळी सणानिमित्त गाव परिसरात गवर व ओंडक्यांची होळी विधिवत पेटविली जाते.नागरिक एकत्र गोळा होऊन हाती एक पेटविलेली गवर घरोघरी घेऊन येतात. त्यावर चणे,खोबर भाजून सेवन केले जाते.धुळवड निमित्त ग्रामीण भागात पळसाच्या गर्द फुलांचा रंग वापरला जातो.केमिकल युक्त रंगांचा वापर टाळून काही भागात पळसाच्या फुलांचा रंग वापरण्याकडे कल दिसून येतो.सध्या तरी खोबर,साखरगाठींनी दुकाने गजबजून गेल्याचे सद्यस्थितीत चित्र आहे.

## साहित्यिक व वयोवृद्ध कलावंत मानधनापासून वंचित

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २८ फेब्रूवारी-**

जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी राजश्री शाहू महाराज साहित्यिक व वयोवृद्ध कलावंत मानधन निवड समिती गठित न केल्यामुळे तीन वर्षापासून वयोवृद्ध कलावंतांनी जिल्हा परिषद पंचायत विभाग नांदेड कार्यालयाकडे प्रस्ताव दिले असून ते प्रस्ताव धूळ खात पडून आहेत त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील कलावंत मानधनापासून वंचित आहेत.

कलावंतांनी अनेक वेळा जिल्हा परिषद कार्यालयासमोर भजन आंदोलन केले व पालकमंत्री अतुल सावे यांना लवकरात लवकर मानधन निवड समिती गठीत करावी म्हणून निवेदनही दिली परंतु अद्यापही पालकमंत्री यांनी याबाबतची दखल घेतलेली नाही. पालकमंत्री यांनी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या हंगामी जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका पूर्वी कलावंताची निवड समिती गठीत करावी अशी नांदेड जिल्ह्यातील वयो वृद्ध कलावंताची एक मुखी मागणी आहे. अनेक कलावंत आपणास मानधन मिळेल या आशेपोटी जिल्हा परिषद कार्यालयाकडे चकरा मारत आहेत. अनेक हाडाच्या उपेक्षित असलेल्या कलावंतांनी आपण शासनाची मानधनाचे मानकरी होऊ अशी अपेक्षा बाळगून अनेक कलावंतांना शेवटी थकून अपेक्षाभंग झाल्यामुळे निराश झाले आहे अशा निराश झालेल्या कलावंतांना न्याय मिळेल काय हा प्रश्न आता डोळ्यासमोर उभा आहे. नांदेड जिल्ह्यातील अनेक दुसऱ्या समित्या गठीत झाल्या परंतु राजश्री शाहू महाराज साहित्यिक वयोवृद्ध कलावंत समिती गठीत केली नसल्यामुळे कलावंत मात्र मानधनापासून वंचित असल्याचे दिसून येत आहे. कला ही पैशाने विकत घेता येत नाही निसर्गाने दिलेली कलावंतांना देणगी आहे. या कलेच्या माध्यमातून समाज प्रबोधन करी समाजातील आणि एक घटकांना ते न्याय देण्याचा प्रयत्न करीत असतात व आपली संस्कृती टिकवून ठेवतात अशा कलावंतांचा साहित्यिकांचा आयुष्याच्या उतरत्या काळामध्ये शासनाकडून त्यांना सन्मानाने मानधन मिळावी ही अपेक्षा उराशी बाळगून आहेत अशा उपेक्षित अंतकरणांच्या कलावंतांना न्याय मिळावा अशी ओरड कलावंतांच्या तोंडून ऐकावयास मिळत आहे.



## कचरा पोत्यात भरून दुकानाला लावली थप्पी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २८ फेब्रूवारी-**

नांदेड महानगरपालिका अंतर्गत सिडको झोन क्रमांक सहा मधील हाडको बस स्टॅन्ड येथील चौकात गल्लीतील केर-कचरा रोडवर टाकला असता तो केर -कचरा भरून नेण्याऐवजी साफसफाई कामगारांनी पोत्यात भरून एका दुकानच्या शटरला थप्पी मारून ठेवला आहे. तर दुकानदारांनी दुकान कसे उघडायचे हा प्रश्न दुकानदारास पडला आहे. तेव्हा मनपा आयुक्त महेश कुमार डोईफोडे यांनी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

सिडको येथील झोन क्रमांक सहा अंतर्गत हडको बस स्टॅन्ड येथे दिनांक २७ फेब्रुवारी रोजी एका दुकानाच्या शटरला केअर कचऱ्याची थप्पी लावून साफसफाई कामगारांनी अजब कारभार केलेला आहे. याकडे सहाय्यक आयुक्त मिर्झा बेग, स्वच्छता निरीक्षक रुपेश सरोदे, सुपरवायझर जाधव यांचे दुर्लक्ष असल्याने साफसफाई कामगार केरकचरा जागच्या जागी पसरवून टाकने किंवा तो कचरा घेऊन जाण्या ऐवजी पोत्यात भरून बाजुच्या दुकानच्या शटरला थप्पी लावून टाकने हा त्यांचा नेहमीचा कार्यक्रम झाला आहे.या कचरामुळे परिसरात दुर्गंधी पसरवत असल्याने आजुबाजूच्या दुकान दाराचे धोक्यात आले आहे.

साफसफाई कामगार साफसफाई करणार आहेत की दुर्गंधी फसवणार आहेत असा प्रश्न सिडको करांना पडला आहे. अशा अनेक वेळा सांगूनही व वर्तमानपत्रातून प्रकाशित करूनही येथील अधिकारी व कर्मचारी बेसुमार वागत असल्याचे दिसून येते वसुलीला मात्र चौक पणे केली जाते. जनतेनी कर भरणे हा त्यांच्या घरामध्ये कचरा टाकून घेणे असा याचा अर्थ दिसत आहे. तरी याकडे मनापासून आयुक्त डॉ .महेश कुमार डोईफोडे यांनी सिडको झोन कडे जरा लक्ष देण्याची गरज आहे अशी चर्चा नागरिकात होत आहे.

## कै.डॉ.शंकरराव चव्हाण यांना अभिवादन

**तभा वृतसेवा**
**धर्माबाद, दि. २८ फेब्रूवारी-**

येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात माजी केंद्रीय गृहमंत्री दिवंगत डॉ.शंकरराव चव्हाण यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त दि.२६ फेब्रुवारी रोजी कै.डॉ.शंकरराव चव्हाण आणि कुसुमताई चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले आहे.

यावेळी त्यांच्या कार्याचे अनेक प्राध्यापकांनी स्मरण करीत त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी धर्माबाद शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. कमलकिशोर काकाणी, सहसचिव तथा उपाध्यक्ष वर्णी नागभुषण,संचालक नागनाथ नोमुलवार,उमेशकुमार झंवर,प्राचार्य डॉ.कमलाकर कनसे,उपप्राचार्य डॉ. योगेश जोशी,डॉ.दुर्गाप्रसाद रांदड यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## निवृत्तीराव वडगावकर यांना 'ग्रंथ महर्षी गंगाधर पटने जीवनगौरव सन्मान' जाहीर

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. २८ फेब्रूवारी-**

नांदेड जिल्हा ग्रंथालय संघ यांच्या २८ व्या वार्षिक अधिवेशनात यंदाचा प्रतिष्ठेचा 'ग्रंथ महर्षी गंगाधर पटने जीवनगौरव सन्मान' मा. निवृत्तीराव वडगावकर यांना जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या निवडीमुळे ग्रंथालय क्षेत्रात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षणमंत्री मा. कमलकिशोर कदम राहणार असून उद्धाटन रविंद्र वसंतराव चव्हाण, खासदार (नांदेड लोकसभा मतदारसंघ) यांच्या हस्ते होणार आहे. तसेच राहुल कर्डिले, जिल्हाधिकारी नांदेड, यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. मान्यवरांच्या उपस्थितीतच निवृत्तीराव वडगावकर यांना जीवनगौरव सन्मान प्रदान करण्यात येणार आहे.

ग्रंथालय चळवळीच्या उभारणीत व जतनात वडगावकर यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय आहे. ग्रामीण भागात वाचन संस्कृती रुजविणे, ग्रंथालयांचे जाळे बळकट करणे आणि तरुण पिढीला ज्ञानसंपादनासाठी प्रोत्साहित करणे या क्षेत्रात त्यांनी दीर्घकाळ कार्य केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत यापूर्वीही त्यांना सन १९८५ मध्ये 'ग्रंथालय भूषण' पुरस्कार तसेच सन १९८७ मध्ये 'तात्यासाहेब शेनई खटखटे ग्रंथालय पुरस्कार' प्रदान करण्यात आले होते.

हे अधिवेशन रविवार, दि. १ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता जनता हायस्कूल, नायगाव येथे आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनात आजची समाजमाध्यमे, वाचन संस्कृती आणि आत्मनिर्भरता या विषयावर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील ग्रंथपाल, वाचनप्रेमी नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांनी कळविले आहे.

निवृत्तीराव वडगावकर यांना जाहीर झालेला हा सन्मान नांदेड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरत असून, ग्रंथालय चळवळीला नवी ऊर्जा देणारा ठरणार आहे.

## आ.चिखलीकर यांच्या हस्ते पाच तलाठी सज्जाचे उद्घाटन

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २८ फेब्रूवारी-**

तालुक्यातील पाच गावाच्या तलाठी सज्जाचे उदघाटन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते तहसील कार्यालय येथे करणयात आले.

लोहा तालुक्यातील सावरगाव (न ),देऊळगाव,धानोरा ,रिसनगाव ,दापशेड या पाच गावच्या तलाठी सज्जा कार्यालयाचे उद्घाटन आ..प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते व तहसीलदार विठ्ठल परळीकर, युवा नेते प्रविण पाटील चिखलीकर याच्या हास्ते उद्घाटन झाले .

यावेळी नगराध्यक्ष शरद पाटील पवार, माजी जि प सदस्य हंसराज पाटील बोरगावकर ,बाधकाम विभागाचे अभियंता सोमवंशी , माजी.सभापती आनंदराव पाटील शिंदे,माजी.उपनगराध्यक्ष दत्ता वाले,माजी उपसभापती रोहित पाटील,गटनेते भास्कर पाटील पवार, बाबाराव पाटील गवते यांची उपस्थिती होती.

**तलाठी यांनी सज्जावर उपस्थित राहावे**

लोहा तालुक्यात ज्या नव्याने तलाठी कार्यालय बांधण्यात आले.त्या सज्जाच्या ठिकाणी तलाठी यांनी उपस्थित राहून लोकांची कामे करावीत जेणेकरून त्याचा लोह्याला येण्याचा वेळ व खर्च वाचेल शिवाय वेळेवर कामे होतील उर्वरित तलाठी सज्जे इमारत बांधण्यात येईल असे आ. चिखलीकर यांनी सांगितले.

## धार्मिक सलोखा बिघडवणाऱ्यांची गय नाही : पो. नि. कराड

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २८ फेब्रूवारी-**

आगामी पवित्र रमजान महिना तसेच विविध सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहरातील सामाजिक व धार्मिक सलोखा अबाधित राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन किनवटचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी केले. कायदा व सुव्यवस्थेचा भंग करण्याचा किंवा जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही, असा सज्जड इशाराही त्यांनी दिला.

बुधवारी किनवट पोलीस ठाण्यात आयोजित 'शांतता समिती'च्या बैठकीत ते बोलत होते. उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळाणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक पार पडली.

पोलीस निरीक्षक कराड म्हणाले, सण आणि उत्सव हे आनंद, एकोपा व बंधुभावाचे प्रतीक आहेत. या काळात सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणे, अफवा पसरवणे किंवा अपप्रचार करणे टाळावे. सायबर सेल अशा प्रकारांवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. कोणतीही माहिती शहानिशा केल्याशिवाय पुढे पाठवू नये.



उत्सवादरम्यान ध्वनी प्रदूषण नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले. निश्चित वेळेनंतर लाऊडस्पीकरला परवानगी दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच शहरातील अवैध धंद्यांवर आणि मोकाट जनावरांच्या समस्येवर नगर परिषदेसोबत संयुक्त कारवाई केली जाईल, अशी माहिती देण्यात आली.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता तातडीने किनवट पोलीस ठाण्याशी किंवा संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. पोलीस प्रशासन त्वरित घटनास्थळी पोहोचेल, असे आश्वासनही देण्यात आले.

बैठकीला माजी नगराध्यक्ष हाजी ईसाखान सरदार खान, ज्येष्ठ नेते राघू मामा, पंचायत समितीचे माजी सभापती मारोतराव सुंकलवाड, शांतता समितीचे सदस्य, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. किनवटमधील हिंदू-मुस्लिम ऐक्याची परंपरा कायम राखण्याचा निर्धार यावेळी सर्वांनी व्यक्त केला.

## किनवट तालुक्यात शिक्षण विभागाचा अजब कारभार; विद्यार्थ्यांचे शिक्षण ठप्प ?

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २८ फेब्रूवारी-**

किनवट तालुक्यातील शिक्षण विभागाच्या कारभाराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. भिशी केंद्रांतर्गत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांची नेमणूक नांदेड जिल्हा परिषद कार्यालयात मागे एक महीना विज्ञान प्रदर्शनासाठी व आता नियंत्रण कक्षासाठी एक महीणा करण्यात आल्याने संबंधित शिक्षक गेल्या दीड ते दोन महिन्यांपासून शाळेत अनुपस्थित असल्याचा धक्कादायक आरोप समोर आला आहे. या प्रकारामुळे प्राथमिक विद्यार्थ्यांचे शिक्षण अक्षरशः ठप्प झाल्याचे चित्र आहे.

ईस्लापूर भागातील भिशी केंद्रांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आधीच सुमारे दहा शिक्षकांची कमतरता असल्याची माहिती आहे. अशा परिस्थितीत दहावी-बारावी परीक्षांसाठी येथील शिक्षकांची नेमणूक केल्यामुळे प्राथमिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होत आहे. गेल्या दीड महिन्यांपासून विज्ञान प्रदर्शन व नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले शिक्षक शाळेत हजर नसल्याने लहान विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

वर्गशिक्षक नसल्याने अनेक वर्ग वाऱ्यावर असून विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अध्यापनात खंड पडला आहे. शिक्षणाचा पाया मजबूत होण्याच्या टप्प्यावरच विद्यार्थ्यांचे ज्ञानार्जन थांबले असल्याची पालकांची तक्रार आहे.

गेल्या दीड महिन्यांपासून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान शिक्षणाधिकारी कशाप्रकारे भरून काढणार, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या संदर्भात किनवट गटशिक्षणाधिकाऱ्यांशी मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही .

**प्राथमिक स्तरावरील शिक्षण बाधित**

एकीकडे 'कॉपीमुक्त शाळा' अभियानाचा गाजावाजा; दुसरीकडे प्राथमिक शिक्षणाचा पाया ढासळतोय?

जिल्हा प्रशासनाकडून कॉपीमुक्त शाळा अभियान राबवले जात असताना प्राथमिक स्तरावरील शिक्षणच बाधित होत असल्याची विसंगती समोर येत आहे.

**दहावी-बारावी परीक्षेसाठी प्राथमिक शिक्षकांची नेमणूक**

प्राथमिक शाळेतील शिक्षकांना माध्यमिक स्तरावरील परीक्षेसाठी अधिकृत मान्यता नसताना अशा नेमणुका कशा केल्या जात आहेत, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**दीड महिन्यांपासून शिक्षण ठप्प; जबाबदारी कोणाची?**

विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी शिक्षण विभाग कोणती उपाययोजना करणार, याकडे पालकांचे लक्ष लागले आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून विद्यार्थ्यांच्या हितासाठी तात्काळ पर्यायी शिक्षकांची नेमणूक करावी, अशी मागणी पालक व स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

**वारंवार मागणी करुनही शिक्षक मिळत नाही: जगदीप हनवते**

सावरकरनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत एकूण पटसंख्या ४५ असून तेथे डेपो टेशन वर एकाच शिक्षकाची नेमणूक केलेली आहे .त्यामुळे येथे विद्यार्थ्यांचे फार मोठे शैक्षणीक नुकसान होत आहे .वारंवार शिक्षण विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिक्षण अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांना संपर्क करून सुद्धा शिक्षक मिळत नाही.

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# थोडक्यात...

## बेकायदेशीर मच्छर अगरबत्ती ‘कम्फर्ट’ची विक्री करणाऱ्या दुकानांवर छापे

**नांदेड :** बेकायदेशीर डास प्रतिबंधक अगरबत्तींविरुद्ध राबवलेल्या कडक अंमलबजावणी मोहिमेत महाराष्ट्र कृषी विभागाने बेकायदेशीर डास अगरबत्तीची ’कम्फर्ट’ची विक्री करणाऱ्या दुकानांवर छापे टाकले आहेत. कोल्हापूरमध्ये गांधीनगर येथील मनोज नॉव्हेल्टीज येथे मोठी कारवाई करण्यात आली, जेथे अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात ’कम्फर्ट’ मच्छर अगरबत्तीचा साठा जप्त केला.याचप्रमाणे नांदेडमध्ये देखील ही मोहिम राबवत अधिकाऱ्यांनी अशाच प्रकारच्या बेकायदेशीर डास प्रतिबंधक अगरबत्ती जप्त केल्या आहेत. पहिला छापा खडकपुरा येथील गुरुनानक मार्केटमधील आर. के. सुरतवाला नावाच्या दुकानावर टाकण्यात आला, जेथे ’कम्फर्ट’ अगरबत्तीचे १,०५६ पाऊच जप्त करण्यात आले. दुसऱ्या कारवाईत, अण्णाभाऊ साठे चौकाजवळील पारसेवार प्रोव्हिजन स्टोअर्सवर छापा टाकून ’कम्फर्ट’ अगरबत्तीचे १० बॉक्स जप्त करण्यात आले.

## सर्वात मोठा ॲथलीजर आणि स्पोर्ट्सवियर झोन सादर

**छत्रपती संभाजीनगर :** फिनिक्स मार्केटसिटी पुणे आता शहरातील स्पोर्ट्स आणि ॲथलीजर खरेदी अनुभव आणखी सोपा आणि आनंददायी बनवत आहे, कारण अनेक प्रसिद्ध ब्रँड्सचे स्टोअर्स आता एका ठिकाणी उपलब्ध आहेत. यामध्ये नाइकी, ॲडिडास, असिक्स, स्केचर्स यांचे प्रमुख फ्लॅगशिप स्टोअर्स आहेत, तसेच न्यू बॅलन्स, रिबॉक, प्यूमा, एक्सस्टेपसारखे ब्रँड्स देखील येथे आहेत. या नवीन झोनमुळे पुण्यातील खरेदीदारांना स्पोर्ट्स आणि ॲथलीजर उत्पादनांचे अनेक पर्याय एकाच ठिकाणी मिळतात. फिनिक्स मार्केटसिटीने या झोनच्या माध्यमातून पुण्यातील वाढती फिटनेस संस्कृती आणि बदलत्या ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन एक खास स्पोर्ट्स आणि ॲथलीजर झोन तयार केला आहे.

## टुईंग, किफायतशीर फूड ॲप छत्रपती संभाजीनगर मध्ये उपलब्ध

**छत्रपती संभाजीनगर:** टुईंग, एक नवीन किफायतशीर फूड डिलिव्हरी ॲपने आज छत्रपती संभाजीनगर शहरात आपल्या सुरुवातीची घोषणा केली. मागील ६ महिन्यांमध्ये, टुईंग आता देशातील १५ शहरांमध्ये तिचा विस्तार केलेला आहे, ज्यामध्ये पुणे, आग्रा, वडोदरा, गुवाहाटी, नाशिक, नागपूर, पटना, मेरठ, भोपाळ, दिल्ली, गुरूग्राम, नोएडा, फरिदाबाद आणि गाझियाबाद यांचा समावेश आहे. टुईंग ॲपवर फूड आणि बिव्हरेजेसची सर्वात कमी किंमत मिळते, आणि रेस्टॉरंटच्या मेन्यूच्या किमती एवढी किंवा त्यापेक्षा कमी किंमत देण्याची हमी आहे. याशिवाय, कोणत्याही ऑर्डरवर पॅकेजिंग चार्ज किंवा प्लॅटफॉर्म फी नाही. त्यामुळे टुईंग मार्केटमधील सर्वात किफायतशीर फूड डिलिव्हरी ॲप ठरेल. युजर्स ९९ रूपयांपेक्षा कमी किंमतीत बिर्याणी, बर्गर, बाउल्ससह अनेक डिशेस ऑर्डर करू शकतात.

## टर्टलमिंट सोबत भविष्याभिमुख विमा सल्लागार व्यवसाय उभारत आहेत

**नाशिक :** नाशिकमध्ये वास्तव्यास असलेले ५२ वर्षीय उद्योजक अनिल सिंग हे २०१८ पासून टर्टलमिंट चे डिजिटल पार्टनर म्हणून कार्यरत आहेत. ग्राहक सेवा आणि डिजिटल विमा वितरण परिसंस्थेशी सक्रिय सहभाग यांच्या माध्यमातून त्यांनी वर्षानुवर्षे आपला विमा व्यवसाय उभारला आहे. मूळचे प्रयागराज येथील असलेले सिंग यांनी वयाच्या १७व्या वर्षी पदवी शिक्षण घेत असताना काम करण्यास सुरुवात केली. १९९६ ते २००३ या काळात त्यांनी वाहतूक व्यवसाय चालवला; मात्र हा व्यवसाय व्यावसायिकदृष्ट्या टिकला नाही आणि त्यानंतरच्या काळात त्यांना दीर्घकाळ आर्थिक तणावाचा सामना करावा लागला. २०१० ते २०१८ दरम्यान त्यांनी वैयक्तिक आणि आर्थिक अडचणींना तोंड दिले, ज्यामुळे त्यांनी पर्यायी व्यावसायिक संधींचा शोध सुरू केला.

## कुटुंबाचे नाते अभिमानाने नव्हे तर प्रेमाने जपले जाते

सोनी सबवरील पौराणिक गाथा शिव परिवाराची – गणेश कार्तिकेय मध्ये पौराणिक कथांतील एक अत्यंत भावनिक अध्याय साकारला गेला आहे. देवी सती (श्रेनू परिख) कैलासावर पोहोचतात आणि भगवान शिव (अविनेश रेखी) त्यांना स्वीकारतात, ज्यामुळे त्यांच्या पवित्र विवाहाचा प्रारंभ होतो. विवाहसोहळ्याच्या विधींची सुरुवात होताच नारद (दक्ष शर्मा) सर्व लोकांना आमंत्रणे देतात, वातावरण आनंदाने भरून जाते, परंतु या उत्सवावर एक वेदनादायी सत्य सावली टाकते.

## न्यायासाठी लढणाऱ्या पुष्पाने सामाजिक प्रश्नाला दिला उजाळा

सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल ही मालिका पुष्पा (करुणा पांडे) हिच्या प्रेरणादायी प्रवासाचे दर्शन घडवते. जीवनातील कठीण प्रसंगांना धैर्याने आणि करुणेने सामोरे जाणारी, आशावादी आणि जिद्दी स्त्री म्हणून तिची कहाणी प्रेक्षकांना भावते. कौटुंबिक नात्यांतील हळुवार भावनांना सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयांशी जोडण्याची ही मालिकेची खासियत आहे. आता पुष्पा इम्पॉसिबल एका अत्यंत प्रभावी आणि भावनिक कथानकासाठी सज्ज होत आहे. आगामी कथा एका कठोर सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब दाखवते – बेफिकीर वाहनचालक आणि सत्ता व विशेषाधिकारामुळे जबाबदारी किती सहजपणे नाहीशी होते याचे चित्रण. अशा घटना वारंवार बातम्यांमध्ये झळकतात आणि आपल्याला आठवण करून देतात की सत्तेच्या छायेत न्याय किती नाजूक वाटू शकतो.

## होळीचा उत्साह मनापासून साजरा करतात

होळी हा केवळ रंगांचा उत्सव नाही. तो आनंद, एकत्रितपणा आणि आपल्या सभोवतालच्या लोकांसोबत असण्याच्या साध्या सुखाचा उत्सव आहे. रंगांच्या खेळांपासून ते हवेत घुमणाऱ्या हास्यापर्यंत, बालपणीच्या आठवणी, कौटुंबिक मेळावे, पार्श्र्वभूमीवर वाजणारे संगीत आणि सणाच्या पदार्थांनी भरलेली ताटे–हा असा दिवस असतो जिथे भेदभाव नाहीसे होतात आणि ऊब व आपुलकी केंद्रस्थानी येते. यंदा सोनी सबवरील कलाकार करुणा पांडे, दीक्षा जोशी, ऋषी सक्सेना आणि श्रेनू परिख यांनी त्यांच्या होळीच्या आठवणी आणि परंपरा शेअर केल्या आहेत, ज्यामुळे हा उत्सव वर्षानुवर्षे खास ठरतो.

# अपहरण झालेल्या लेकीसाठी हिंदू जन आक्रोश मोर्चा

## पैठणला कॉप्युटर्स क्लास शिकविणाऱ्या शिक्षकाने १८ वर्षीय विद्यार्थिनीचे फिल्मीस्टाईल अपहरण

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. २८ फेब्रुवारी :** यशवंतनगर भागातील मुलीचे एका नराधमाने आपल्या साथीदाराच्या मदतीने दोन दिवसांपूर्वी अपहरण केले असून पोलिसांना त्यांचा थांग पत्ता लागत नाहीये.या प्रकरणी आरोपीला तात्काळ अटक करून त्याच्यावर कडक शासन करावे त्याच्याकडुन मुलीची सुखरूप सुटका करावी या मागणीसाठी रविवारी दिनांक १ मार्च रोजी सकाळी १० वाजता खंडोबा महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारक असा भव्य हिंदू जन आक्रोश मोर्चा निघणार आहे.



पैठण शहरातील कापड मंडई परिसरातील महाराष्ट्र कॉप्युटर्स शिक्षण घेणाऱ्या एका १८ वर्षीय विद्यार्थिनीला शिक्षकाने फिल्मी स्टाईल अपहरण केल्याची घटना शुक्रवारी उघडकीस आल्यामुळे पैठण पोलिसांनी दोन आरोपीला शोधण्यासाठी चार पथक तयार करून शोध कार्य सुरू केले आहे या घटनेमुळे पंचक्रोशीत खळबळ उडाली असून पालकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अधिक माहिती अशी की शहरातील कापड मंडई परिसरात महाराष्ट्र कॉप्युटर्स क्लास शिकविल्या जात असल्यामुळे अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी सदरील कोर्स शिकण्यासाठी या ठिकाणी प्रवेश घेतलेला असून हा कोर्स शिकविण्याचे काम चिराग फारुख रा. पैठण याने या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या शहरातील एका कीर्तनकार महाराज यांच्या १८ वर्षीय विद्यार्थिनीला लग्नाची मागणी करून एका अनोळखी मित्रासोबत दि.२५ रोजी चक २० ऋइ ४७७९ क्रमांकाच्या मोटर सायकलवर दुपारी तीन वाजेच्या दरम्यान विद्यार्थिनीच्या घराच्या गेट समोर उभा राहून सदरील विद्यार्थिनीला आवाज देऊन मित्राच्या मदतीने बळजबरीने हातपाय पकडून मोटर सायकलवर बसविले यावेळी सदरील विद्यार्थिनी आरडाओरडा करीत असल्याने या विद्यार्थिनीच्या एका नातेवाईकाच्या मुलाने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला परंतु सदरील शिक्षक चिराग फारुख यांनी या मुलाला लाथानी मारहाण करून बाजूला केले व फिल्मी स्टाईलने या विद्यार्थिनीचे अपहरण केले. सदरील विद्यार्थिनीच्या पालकांनी अनेक ठिकाणी शोध घेतल्यानंतर विद्यार्थिनी मुलीचा शोध न लागल्याने पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्याकडे या अपहरण प्रकरणाची तक्रार विद्यार्थिनीच्या चुलत्याने दाखल केली. या घटनेमुळे पैठण पंचक्रोशीत एकच खळबळ उडाली असून घटनेचे गांभीर्य लक्षात घेता शिक्षक चिराग फारुख व त्याच्या एका अनोळखी मित्राचा शोध घेण्यासाठी चार पोलीस पथक तयार करून वेगवेगळ्या ठिकाणी शोध घेण्याचा प्रयत्न सुरू केला.

**दरम्यान विद्यार्थिनीचा अपहरण करणाऱ्या सदरील शिक्षकांनी काही दिवसापूर्वी असाच एक प्रकार केल्याची चर्चा सुरू असून सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे समजते.आता याच नराधमाणे वारकरी संप्रदायचे शिक्षण देणाऱ्या महाराज यांच्या मुलीचे अपहरण केल्याने तालुक्यात जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. अप्रहत लेकीची सुटका आणि आरोपीला कडक शासन करावे या मागणीपर भव्य जन आक्रोश मोर्चाचे आयोजन रविवारी सकाळी करण्यात आले आहे.**

# ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रीय ज्ञान दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. २८ फेब्रुवारी :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूल सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी शालेय स्तरावरील विज्ञान प्रदर्शन उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नीलकंठ बक्षी सर उपस्थित होते. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला तसेच मुख्याध्यापिका सविता तोतला यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन तसेच महान वैज्ञानिक सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या विज्ञान शिक्षिका काजल देशमुख यांनी केले. आपल्या प्रेरणादायी भाषणात नीलकंठ बक्षी सर यांनी विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टीकोनाला व चिकित्सक वृत्तीला चालना मिळते, तसेच विज्ञानाचा दैनंदिन जीवनात कसा उपयोग होतो याचे प्रात्यक्षिकाद्वारे उदाहरण सादर केले. शाळेतील विज्ञान शिक्षिका काजल देशमुख व इतर शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता पहिली ते सातवीच्या एकूण ४२ विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रयोगकृती सादर केल्या. मान्यवर व पालकांनी प्रदर्शनास भेट देऊन विद्यार्थ्यांकडून प्रयोगांची माहिती जाणून घेतली आणि बालवैज्ञानिकांचे कौतुक केले.



उत्कृष्ट प्रयोगकृती सादर करणारे विद्यार्थी : इयत्ता पहिली – ट्रॅफिक सिग्नल : दुर्वा तोष्णीवाल, काव्या थोटे, समिक्षा वाणी, इयत्ता दुसरी – वॉटर फिल्ट्रेशन : हम्मद शेख, इयत्ता तिसरी – हायड्रोपोनिक फार्मिंग : आर्यन काव्हरे, इयत्ता चौथी – विंड मिल : अस्तिक पांडे, इयत्ता पाचवी – पृथ्वी आणि चंद्र : अवनी गोर्डे, कनिष्का मढीकर, इयत्ता सहावी – वॉटर लेव्हल इंडिकेटर : निरंत राऊत, सुयश सिंग, इयत्ता सातवी – आधुनिक शेती : अनुज देशमुख, कार्तिक हाडे विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण होऊन त्यांच्या जिज्ञासू वृत्तीला नवे बळ मिळाले.

# तहसीलदारांना शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन

## १५ दिवसांत निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. २८ फेब्रुवारी :** तालुक्यातील मक्का उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी, अतिवृष्टीचे थकीत अनुदान आणि स्वस्त धान्य योजनेतील प्रलंबित प्रश्नांबाबत सोयगाव तालुका प्रशासनाला निर्वाणीचा इशारा देण्यात आला आहे.भाजप शहराध्यक्ष मंगेश सोहनी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने दि.२५ बुधवार रोजी तहसीलदार महोदयांना मागण्यांचे निवेदन सादर केले.येत्या १५ दिवसांत या मागण्या मार्गी न लागल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन किंवा बेमुदत उपोषण छेडण्यात येईल,असा इशारा यावेळी देण्यात आला.



प्रमुख मागण्या: मक्का खरेदीचा लक्षांक वाढवा,मक्का उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी असल्याने सध्याचा खरेदी लक्षांक अपुरा आहे. तो वाढवून खरेदी प्रक्रिया युद्धपातळीवर राबवावी.थकीत देयके ८ दिवसांत द्या: ज्या शेतकऱ्यांच्या मक्याची खरेदी झाली आहे, त्यांचे पैसे पुढील ८ दिवसांत खात्यात जमा करावेत.अतिवृष्टी अनुदान तात्काळ द्या: सन २०२४ मधील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या आणि श-घधउ पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीची रक्कम त्वरित वर्ग करावी.

स्वस्त धान्य अनुदानाची थकीत रक्कम: मागील ३-४ वर्षांपासून ज्यांचे धान्य बंद आहे, अशा शेतकऱ्यांच्या हक्काचे अनुदान तात्काळ मिळावे.

प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे बळीराजामध्ये मोठा असंतोष असून १५ दिवसांच्या मुदतीत सकारात्मक निर्णय न झाल्यास होणाऱ्या परिणामांना प्रशासन सर्वस्वी जबाबदार राहील असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.यावेळी भाजप शहराध्यक्ष मंगेश सुभाष सोहनी, भाजप युवा मोर्चा शहराध्यक्ष मयुर मनगटे,भाजप जिल्हा चिटणीस सुनील गावंडे, व भाजप व्यापारी आघाडीचे राहुल परदेशी यांच्यासह अन्य कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

### विहिंप मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामातर्फे आयोजित

# फेटा प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २८ फेब्रुवारी :** महाराष्ट्रीयन संस्कृतीत फेटा (पगडी) हे प्रतिष्ठा, सन्मान आणि परंपरेचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे फेटा प्रशिक्षक जयसिंग होलीये यांनी केले. विश्र्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामातर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त रोकडे हनुमान मंदिर येथे आयोजित फेटा प्रशिक्षण शिबिरात ते बोलत होते.

होलिये यांनी फेटा बांधण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करत सहभागी नागरिक व महिलांना मार्गदर्शन केले. फेटा हा केवळ वेशभूषेचा भाग नसून मान-सन्मानाचे प्रतीक आहे. पूर्वी सत्कार समारंभात मान्यवरांना फेटा बांधून गौरविण्याची परंपरा होती. तसेच संकटकाळात फेट्याचा उपयुक्त वापर कसा होऊ शकतो, याबाबतही त्यांनी माहिती दिली. प्रशिक्षणानंतर नियमित सराव करण्याचे आवाहन त्यांनी केले.

समारोप प्रसंगी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार यांनी कोल्हापुरी, पुणेरी, मावळी, बाशिंगी आदी फेट्यांच्या विविध प्रकारांची माहिती दिली. पांढरा, भगवा व केशरी रंगाचे फेटे सण, मिरवणुका व विवाहसोहळ्यात अभिमानाने परिधान केले जातात, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर जाधव यांनी केले.



# मराठी दिनानिमित्त हस्तलिखित ज्ञानेश्वरी ग्रंथाची भेट

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. २८ फेब्रुवारी :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई द्वारा संचालित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर, पैठण येथे मराठी भाषा दिनानिमित्त सुंदर व सुवाच्च हस्ताक्षरात लिहिलेली ज्ञानेश्वरी ग्रंथ शाळेला भेट देत हस्ताक्षर सुधारणे चे धडे देण्यात आले.



अतिशय अगळ्यावेगळ्या पद्धतीने करण्यात आला मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी जि. प. प्रशाला,नायगाव येथील निवृत्त मुख्याध्यापक विठ्ठल शंकराव सावंत यांनी भेट देऊन हस्तलिखित ग्रंथराज ज्ञानेश्वरी ची प्रत शाळेला भेट दिली.त्यांनी मुलांना आवर्जून सांगितले की मी भा. शि. प्र.संस्थेचा माजी विद्यार्थी असून श्री. सिध्देश्वर शै.संकुल, माजलगाव येथून माझ्या वर झालेल्या संस्काराचे बाळकडू मला इथपर्यंत घेऊन आले. हे त्यांनी स्वागत प्रसंगी सांगितले. सकाळच्या परिपाठालाच हजेरी लावत विद्यार्थ्यांना मराठी दिनाच्या शुभेच्छा देऊन सुवाच्च व सुबक अक्षर रेखाटनाच्या क्लुप्त्या सांगितल्या. स्वतःचे अनुभव सांगताना त्यांनी केलेली ही अक्षर सेवा कशी घडत गेली हे ही सांगितले फक्त १५ महिन्यात ही भावार्थ दीपिका संत ज्ञानेश्वर महाराज सप्त शतकोत्तर अमृत महोत्सवी वर्षात त्यांनी पुर्ण करून सद्गुरु चरणी अर्पण केली.

मा.मुख्याध्यापक तथा भा.शि.प्र.चे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भास्कर कुलकर्णी यांनीही त्यांचे सहर्ष स्वागत करत,यथोचित सत्कार व सन्मान केला. दिलेली हस्तलिखित प्रत शालेय ग्रंथालयात विभाग जतन करून ठेवली जाईल अशी ग्वाही देऊन ती प्रत आशुतोष पानगे यांच्या कडे सुपूर्द करण्यात आली.

# भटके कुत्रे पकडण्यासाठी मोहीम

**तभा वृत्तसेवा**

**गंगापूर, दि. २८ फेब्रुवारी :** मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी गंगापूर नगरपालिकेकडून मोकाट कुत्रे पकडण्यासाठी मोहीम राबविण्यात येत आहे.दिनांक २८ फेब्रुवारी रोजी शहरातील नृसिंह मंदिर परिसर,नृसिंह कॉलनी आदी भागातील अनेक मोकाट कुत्रे पकडण्यासाठी श्र्वान पथकाच्या गाडीत अनेक कुत्रे पकडून टाकण्यात आले आहेत. परिसरातील आणि शहरातील नागरिकांना अनेक मोकाट कुत्र्यांनी चावा घेतल्याने सदरील मोहीम राबविण्यात आली आहे. ही मोहीम तीन ते चार दिवस चालणार असून अनेक मोकाट कुत्रे शहरात भटकत असून नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे .त्यामुळे दोन शानपथकाच्या कारवाईत बारा ते पंधरा कुत्रे पकडण्यात आले आहे, ही कारवाई नगरपालिका प्रशासनाकडून राबविण्यात येत आहे.



# १६ कोटींच्या अपहाराचा सचिन घायाळ यांच्या विरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. २८ फेब्रुवारी :** शिवसेना उपनेते सीए सचिन विक्रमराव घायाळ यांच्या विरोधात पैठण एम.आय.डी.सी पोलीस ठाण्यात सुरेश पंडितराव काकडे यांच्या फिर्यादीवरून संत एकनाथ सहकारी साखर कारखाना विस्तारिकरणाच्या नावाने दिशाभूल करत बँकेकडे कारखान्याची मालमत्ता गहाण ठेवत कर्जाची रक्कम १६ कोटी ६२ हजार रुपयांचे अपहार व गैरव्यवहार प्रकरणी भारतीय न्याय सहिंताच्या विविध कलामान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्र्वर जगदाळे करत आहेत.

सचिन घायाळ यांनी संत एकनाथ सह. साखर कारखान्याच्या आधुनिकिकरण व विस्तारिकरणासाठी कारखाण्याची मालमत्ता बँके कडें तारण गहाणखत करुन देऊन उचल केलेले कर्ज कारखाण्या साठी न वापरता दिशाभूल करुन कपटी पणाने अप्रामाणिकपणे कर्ज प्रकरण करताना जाणीव पूर्वक बनावट, खोटे व दिशाभूल करणारे कागदपत्र तयार करुन बँके कडून कर्ज उचल करुन साखर कारखाना व सभासदांचा विश्र्वासघात करुन फसवणूक केली व कर्ज जमा रक्कमेचा विनियोग इतरत्र करुन १६००६२००० रु ( सोळा कोटी बासस्ट हजार रु ) रकमेचा अपहार व गैरव्यवहार केला म्हणून पैठण एम आय डी सी पोलीस ठाण्यात गुरनः-६३/२०२६ कलम ३१८(४),३१६(२),३३६(२),३३६(३),३३८,३४०(२),२३८,३(५) बी एन एस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिन घायाळ यांच्या विरोधात याआधी असाच प्रकार घडल्याने त्यांचे संत एकनाथ सहकारी कारखाण्याचे संचालक पद रद्द करण्यात आले होते.



कुणाच्या बोलण्याने आणि सांगण्याने गुन्हा दाखल होत नसतो. पैठण एम.आय.डी.सी पोलिसांनी घायाळ यांच्या विरोधात पुरावे बघूनच गुन्हा दाखल केला असेल.याबाबत आपला काहीही संबंध नाही. उलट संत एकनाथ सहकारी साखर कारखाण्यात मोठया प्रमाणात शेतकरी, सभासद, कामगार आणि संचालक यांच्यावर अन्याय होत असल्याने ते भेट घेऊन आपली व्यथा मांडत आहेत.याबाबत रितसर तक्रार दाखल करू

**– आमदार विलास बाप्पू भुमरे.**



हा गुन्हा पूर्णपणे राजकीय प्रेरित असून कारखाण्याला त्रास देत असल्याने सुरेश पंडित काकडे यांच्या विरोधात आम्ही दोन महिन्यांपूर्वी जनहीत याचिका दाखल केली आहे. हा काकडे आमदार विलास भुमरे यांचा नातलग असून मंत्रालयात बसून आमच्या विरोधात हा कट रचण्यात आला आहे. काही दिवसात याबाबतीत पत्रकार परिषद घेऊन सखोल माहिती दिली जाईल.

**–सीए सचिन घायाळ**

